# प्रकरण चौथे
# सामाजिक-धार्मिक-आर्थिक स्थिती

आतापर्यंतच्या प्रकरणात वाकाटक राजवंशाचा राजकीय इतिहास आणि वाकाटककालीन मराठवाड्यातील स्थळे आणि तेथील पुरातत्वीय अवशेषांचा आढावा आपण घेतला आहे. वाकाटककालीन मराठवाड्यातील सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी आपल्याला वाकाटकांचे कोरीव लेख, ताम्रपट, अजिंठा लेण्यांतील चित्रकला आणि अजिंठा, वेरुळ, औरंगाबाद, शिऊर, खरोसा व घटत्कोच येथील लेण्यातील मूर्तिशिल्पाचा साधन म्हणून उपयोग होतो. याच साधनांच्या आधारे प्रस्तुत प्रकरणात वाकाटककालीन मराठवाड्यातील सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक स्थितीचा आढावा घेतला आहे.

## ४.१ सामाजिक स्थिती :

**वर्णव्यवस्था -** वाकाटक काळात मराठवाड्यातील समाजात वर्णव्यवस्था प्रचलित होती. वाकाटक काळातील समाजव्यवस्थेचा प्रमुख आधार वर्णव्यवस्था हा होता. यामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार वर्णाचा समावेश होतो. त्यांची कर्तव्य व अधिकार ठरलेले असत. ही वर्णव्यवस्था कार्य व श्रमाच्या आधारावर बनलेली होती. भारतात वर्णव्यवस्थेचा उदय केव्हा आणि कसा झाला याबाबत कसलाही निश्चित व ठोस पुरावा उपलब्ध नाही. विद्वानांच्या मते वर्णव्यवस्थेचे कोणते ना कोणते तरी रुप वैदिक काळापूर्वी अवश्य असावे. परंतु वर्णव्यवस्थेचा जन्म कसा झाला या संदर्भात त्यांच्यात एकमत नाही. ऋग्वेदाच्या पुरुषसूक्तात वर्णव्यवस्थेचा सर्वात प्राचीन उल्लेख सापडतो.[१] ऋग्वेदिक ऋषीने संपूर्ण समाजाला एका विराट पुरुषाच्या रुपात कल्पिले आहे. याच पुरुषापासून सृष्टी जन्माला आली. या पुरुषाच्या मुखापासून ब्राह्मण, बाहूपासून क्षत्रिय, मांड्यापासून वैश्य व पायापासून शूद्राची निर्मिती झाली.[२] हाच सिध्दांत महाभारत, मनुस्मृती, विष्णुपूराण व वायुपूराणात प्रतिपादन केला आहे.[३]

गुण व कर्मावरुन वर्णोत्पत्ती झाली असाही एक सिध्दांत प्रतिपादन केला जातो. या सिध्दांताचे प्रतिपादन गीतेमध्ये करण्यात आले आहे. श्रीकृष्णाने स्पष्ट म्हटले आहे की गुण व

कर्मानुसार विभागपूर्वक मी चार वर्णाची सृष्टी केली आहे.[४] विष्णू व वायू पुराणांतही वर्णाचा आधार गुण व कर्म असल्याचे म्हटले आहे. महाभारतातही गुणक्रमानुसार वर्ण व्यवस्थेचाच पुरस्कार केलेला आहे.[५] व्यवसायावरुनही वर्णाची उत्पत्ती झाली. बुध्दीच्या आधारावर व्यवसाय करणारे विद्वान ऋषी ब्राह्मण झाले. बाहुबलाच्या जोरावर कर्म करणारे क्षत्रिय झाले. व्यापार करणारे वैश्य तर या तिघांची सेवा करीत राहणारे लोक शूद्र झाले.[६] कर्माच्या आधारावर विश्वमित्र, नाभाग व राजा शर्याती यांचे वर्ण बदलले होते. वर्णोत्पत्तीच्या उदयाचे शेवटचे कारण म्हणजे समाजाची आवश्यकता होय. प्रारंभी मानवी समाज अत्यल्प होता आणि त्यांच्या गरजासुध्दा मर्यादित होत्या. कालांतराने बुध्दीचा विकास व लोकसंख्येच्या वाढीमुळे समाजातील कार्य वाढले. त्यामुळे या कार्याचे विभाजन करण्याची आवश्यकता निर्माण झाली. त्यानुसार प्रकृती, रुची व सामर्थ्यानुसार विभिन्न कर्मे निश्चित केली गेली. त्यामधुनच समाजात चार वर्णाचा जन्म झाला.[७] अशा रीतीने ऋग्वेदिक काळाच्या अंतिम चरणात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णाचा उदय झाला. त्यांचे अधिकार व कर्तव्ये या विषयी या ठिकाणी माहिती घेणे आवश्यक ठरते.

### १) ब्राह्मण :

चार वर्णातील पहिला वर्ण ब्राह्मण आहे. चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेत ब्राह्मण वर्णाला सर्वोच्च स्थान होते. या वर्णाची निर्मिती एका विराट पुरुषाच्या मुखापासून झाली. धर्मसूत्रे व स्मृतीमध्ये वर्णाची कर्तव्ये व त्यांच्या विशेषाधिकारांची सविस्तर चर्चा केलेली आहे. अध्ययन करणे, यज्ञ करणे व दान देणे ही या वर्णाची कर्तव्य होती तर वेदाध्ययन करणे, यज्ञ करुन घेणे व दान घेणे हे या वर्णाचे विशेषाधिकार होते.[८] ब्राह्मण यावर्णाच्या उदरनिर्वाहाची प्रमुख तीन साधने होती.

१) वेदांचे अध्यापन करुन धन प्राप्त करणे.

२) पौरोहित्य ( धार्मिक कार्य ) कर्म करुन धनग्रहण करणे.

३) कोणत्याही योग्य व्यक्तीपासून किंवा दोषरहित व्यक्तीपासून दान ग्रहण करणे.[९]

या तीन कर्तव्याशिवाय धनप्राप्तीसाठी ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांना नेमून दिलेली कामे करुन उपजीविका करु शकत असत. आपत्काळात ब्राह्मण शूद्रासाठी निश्चित केलेली कामे सुध्दा करु शकतो. परंतु तो शूद्राबरोबर भोजन करु शकत नाही. आपत्काळ संपल्यानंतर शूद्राची कामे

करणाऱ्या ब्राह्मणास शुध्दीसाठी प्रायश्चित घ्यावे लागे. त्यानंतरच तो पुन्हा आपली कर्तव्ये करु शकत असे.

चातुवर्णात ब्राह्मणाला अग्रस्थान दिले होते. त्याने आपले आयुष्य वेदाध्ययनात, यज्ञानुष्ठानात व धर्मोपदेशात घालवावयाचे असे. धर्मसूत्रातील बहुतांश नियम त्याच्या आचरणाविषयी आहेत. तसे संयमी जीवन न जगणाऱ्याला तो मान मिळत नसे. एवढेच नाही, तर तो पतित गणण्यात येई. त्याला व्यापार, सावकारी, वैद्यकीय इत्यादी व्यवसाय करता येत नसत.[१०] आपत्काली मात्र हे निर्बन्ध शिथिल केले जात. सामान्यत: ब्राह्मणाने पाहण्याकरिताही शस्त्र हातात घ्यावयाचे नसे.[११] पण समाजात बंडाळी माजून धार्मिक जीवन अशक्य झाल्यास क्षत्रियाप्रमाणे इतर द्विजातींनीही शस्त्रग्रहण करावे असे मनूने म्हटले आहे.[१२] त्याला अनुसरुन अनेक ब्राह्मणांनी वर्तन केल्याचे प्राचीन भारतीय इतिहासात नमुद आहे. शुंग, काण्व, सातवाहन, वाकाटक व कदम्ब इ.प्राचीन भारतातील प्रस्थापित राजवंश ब्राह्मण जातीचे होते.

जे ब्राह्मण वेदशास्त्रात पारंगत होत त्यास समाजात अत्यंत मानाचे स्थान असे. काही ब्राह्मण एकापेक्षा अधिक वेदांचे अध्ययन करीत, त्यांच्या नावामागे द्विवेद यासारखे उपपद लावीत. ही उपपदे अद्यापि आडनावे झाली नव्हती. काही ब्राह्मण श्रौत व गृह्य यागांचे पौराहित्य करीत. गणयागासारख्या काही यागांचे अनुष्ठान दुसऱ्या करिता करणे धर्मसूत्रांत निषिध्द मानले असल्याने ते याग करणाऱ्यांना मोठमोठी दाने मिळत, पण त्यांना समाजात मान्यता नसे, व श्राध्दादि प्रसंगी त्यांना आमंत्रण मिळत नसे. काही ब्राह्मण नैष्ठिक ब्रह्मचर्याचे पालन करीत. जांब ताम्रपट ज्याला दिला होता तो कालुट्टक ब्राह्मण अशा तऱ्हेचा ब्रह्मचारी दिसतो. काही ब्राम्हण आपल्या विशुध्द धार्मिक आचरणाबद्दल प्रसिध्द होते. प्रभावतीगुप्ताचा पुणे ताम्रपट ज्याला दिला तो आचार्य चनालस्वामी या तऱ्हेचा ब्राह्मण दिसतो. त्याला भगवतभक्त असे विशेषण लावले आहे. हा रामगिरी येथे राहत होता, व त्याच्यावर भगवान रामचंद्राच्या पादुकांच्या पूजाअर्चेची व्यवस्था सोपविली होती असे दिसते. कारण प्रभावतीगुप्तेने आपले दान भगवान रामचंद्राच्या पादमूलांना ( पादूकांना ) अर्पण करुन मग ते त्याला दिले होते. ब्राह्मणांच्या नावाच्या शेवटी शर्मन, आर्य, आचार्य, सवामिन यासारखा एखादा शब्द असे. ते भिन्न वेदांचे आणि शाखेचे किंवा चरणांचे अनुयायी होते. सर्वच

लेखांत ब्राह्मणांच्या वेदशाखांचा उल्लेख केला नसल्याने ही माहिती अर्थातच त्रोटक आहे, पण मिळतात त्या उल्लेखांवरुन काही अनुमाने काढता येतात. वाकाटकांच्या लेखांत ऋग्वेदी व सामवेदी ब्राह्मणांचा स्पष्ट उल्लेख कोठेही येत नाही, हे आश्चर्य आहे. यजुर्वेदाच्या शाखांपैकी तैत्तिरीय शाखेचे ब्राह्मण शुक्ल यजुर्वेदाच्या माध्यन्दिन शाखेचा होता. तो मेकला देशात राहत असे. दुसरे दोन दान दिलेले ब्राह्मणही वाजसनेय शाखेचे किंवा शुक्ल यजुर्वेदाचे असावे, कारण त्यांच्या गोत्राच्या मागे वाजि हे उपपद लावले आहे. अथर्ववेदीय ब्राह्मण सध्या अत्यंत अल्पसंख्य आहेत. पण त्या काळी ते तसे नव्हते. कारण वाकाटकांचे तिरोडी व वाशीम ताम्रपट या वेदाच्या ब्राह्मणांना दिले होते. यापैकी एक ब्राह्मण बालाघाट जिल्ह्यात व दुसरा अकोला जिल्ह्यात राहत होता.

काही ब्राह्मण राज्यशासनांत उच्च पदांवर असावेत. कोरीव लेखांत राजसेवकांच्या जातीचा उल्लेख कोठेही येत नसल्यामुळे या बाबतीत फारशी माहिती मिळत नाही. तथापि प्रभावतीगुप्ताच्या ताम्रपटांत दूतक म्हणून उल्लेखिलेला देवनन्दस्वामी हा ब्राह्मण असावा. तसेच ज्यांच्या नावांच्या शेवटी दास आहे काही दानपत्रांचे लेखकही ब्राह्मण असण्याचा संभव आहे.

## २) क्षत्रिय :

वर्णव्यवस्थेतील क्षत्रिय हा दुसऱ्या क्रमाचा वर्ण आहे. या वर्णाची निर्मिती विराट पुरुषाच्या बाहूपासून झाली. जो वर्ग समाजाचे रक्षण करण्यासाठी तत्पर झाला त्या वर्गास क्षत्रिय वर्ण म्हणून ओळखले जाऊ लागले. अध्ययन करणे, यज्ञ करणे, दान देणे, समाजाचे रक्षण करणे, युध्दक्षेत्रातून पळून न जाणे, प्रजेचे पालनपोषण करणे व सांसारिक विषयभोगाची इच्छा न करण ही या वर्णाची कर्तव्य होती.[१३]

क्षत्रियांची कर्तव्येही आपस्तंबाने अशीच विस्तारपूर्वक सांगितली आहेत. राजाने आपले गुरु व अमात्य यांच्या पेक्षा जास्त ऐश्वर्याने राहू नये.[१४] त्याच्या राज्यात क्षुधेने, रोगाने, थंडीने किंवा ऊष्माघाताने कोणीही मृत्यू पावू नये.[१५] त्यांच्या राज्यातील ग्रामांत किंबहुना अरण्यांतही तस्करांचे भय नसावे,[१६] त्याने संदेह असल्यास कोणालाही दंड करु नये.[१७] शरण आलेल्या शत्रूला ठार मारु नये.[१८] इत्यादि सुसंस्कृत राज्यपध्दतीतील सर्व विशेषांचा आपस्तंब - धर्मसूत्रात उल्लेख आहे.

क्षत्रियांच्या उदरनिर्वाहाची पुढील तीन साधने प्रचलित होती.[१९]

१) युध्द करुन विजय मिळविलेल्या प्रदेशात मिळालेली लूट ( धन ) क्षत्रियांची असे.

२) न्यायकार्य संपल्यानंतर अपराध्याकडून प्राप्त झालेले दंडधन क्षत्रिय उपजीविकेसाठी वापरु शकत असत.

३) रक्षण कार्याचा मिळणारा मोबदला क्षत्रियांचा असे.

याशिवाय आपत्काळात क्षत्रिय वैश्य वृत्ती व शूद्र वृत्ती करु शकत असत. मात्र त्यांना ब्राह्मणवृत्ती करता येत नसे.

वर्णव्यवस्थेत ब्राह्मणानंतर क्षत्रियांचे स्थान येते. बरेचसे क्षत्रिय राज्यशासनांत नियुक्त केले असावे. द्वितीय प्रवरसेनाच्या कारकीर्दीच्या अकराव्या व तेराव्या वर्षी दिलेल्या दानपत्रांत उल्लेखिलेला सेनापती चित्रवर्मा हा त्याच्या नावावरुन क्षत्रिय दिसतो. दुसरे कित्येक सेनापती जसे चमिदास, नमिदास, बाप्पदेव व कात्यायन - हेही क्षत्रिय असण्याचा संभव आहे, पण त्याविषयी निश्चित सांगणे अशक्य आहे. ऋध्दपुरच्या ताम्रपटाचा लेखक प्रभुसिंह हा त्याच्या नावावरुन क्षत्रिय दिसतो.

## ३) वैश्य :

वैश्य या तिसऱ्या वर्णाची निर्मिती विराट पुरुषाच्या मांड्यापासून झाली आहे. अध्ययन करणे, यज्ञ करणे, दान देणे, शेती, व्यापार व पशुपालन करणे तसेच कर्जावरील व्याज घेणे.[२०] ही वैश्यांची कर्तव्ये होती. वैश्य वर्ण संपत्तीच्या दृष्टीने सर्वाधिक समृध्द होता. वैश्याच्या उपजीविकेचे साधन म्हणजे आपल्या वर्णधर्माचे पालन करणे हे होते. वैश्यांना शेती व व्यापार करुनच आपली उपजिवीका करावी लागे. वैश्य आपत्काळात दुसऱ्या वर्णाची सेवा करुन शूद्र वृत्ती करु शकत असे. परंतु त्यांना ब्राह्मण वृत्ती व क्षत्रिय वृत्ती करता येत नसे. वैश्यांनी निर्माण केलेल्या संपत्तीवर केवळ वैश्यांचाच एकाधिकार नव्हता, तर आवश्यकता पडल्यास ती समाजाची संपत्ती मानली जात होती. अन्य तीन वर्ण या संपत्तीतील आपापला भाग घेऊ शकत असत. केवळ याचमुळे समाजात आर्थिक असंतोष निर्माण होत नसे.

## ४) शूद्र :

शूद्र हा सर्वात शेवटचा वर्ण आहे. त्याची उत्पत्ती विराट पुरुषाच्या पायापासून झाली. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांची सेवा करणे.[२१] एवढेच कर्तव्य शूद्राचे होते. समाजाची सेवा करण्यासाठीच शूद्रांची निर्मिती केली. तीनही वर्णाची सेवा करुन त्यांना संतुष्ट ठेवण्यामुळेच शूद्र स्वर्गसुख प्राप्त करु शकतो. अशी कल्पना करण्यात आली आहे. शुद्रांना धर्मकार्य, संस्कार व मंत्रोच्चार करण्यास परवानगी नव्हती. त्यांना वेदाध्ययनाचा अधिकार तर नव्हताच, परंतु वेदाध्ययन करणाऱ्या व्यक्तीजवळ सुध्दा ते बसू शकत नव्हते. एखाद्या शुद्राने असे केलेच तर त्याला कठोर शिक्षा दिली जाई. शूद्राचे अनिर्वासित व निर्वासित असे दोन प्रकार आहेत. अनिर्वासित शूद्र नगरात राहतो व निर्वासित शूद्र नगराबाहेर राहत असत. तीन वर्णाची सेवा करुनच शूद्र उदरनिर्वाह करीत असत. त्यांच्याकडून मिळालेली जूनी वस्त्रे, चप्पल, चटई, पगडी व उष्टे जेवण शूद्र स्वीकार करीत असत.[२२] शूद्रांना संपत्तीचा साठा करता येत नसे. शूद्राचं प्रमुख कर्तव्य इतर वर्णाची सेवा हे असले तरी तो कारुकर्मात व विविध धंद्यांत निपुण असे.

वाकाटक काळात वर्णव्यवस्था लवचिक होती. त्याकाळात राजवंश ब्राह्मण व क्षत्रिय होते. वाकाटक राजे ब्राह्मणअसून त्यांचे गोत्र विष्णुवृध्द होते.[२३] मेकला देशावर राज्य करणारे वाकाटकांचे मांडलिक आपणास सोमवंशी पांडवाचे वंशज मानत असत. अर्थात ते क्षत्रिय होते.

## कुटूंबपध्दती :

वाकाटक काळात संयुक्त कुटूंबपध्दती प्रचलीत होती. एकाच कुटूंबात पती, पत्नी, भाऊ, बहीण, त्यांचे मुले, मुली, आजोबा व आजी रहात होते. समाजात पितृसत्ताक कुटूंबपध्दती प्रचलित होती. पिता हाच संपूर्ण कुटूंबाचा कर्ता व स्वामी होता. त्याला गृहपती म्हटले जात असे.[२४] कुटूंबातील सर्व सदस्यांवर त्यांचे नियंत्रण असे. कुटूंबातील सर्व सदस्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी गृहप्रमुख या नात्याने पित्यावर येत असे. एकाच कुटूंबात जवळपास तीन पिढ्यापर्यंतचे लोक रहात होते व पित्याला कुटूंबाबाबतचे असीमित अधिकार असत. गृहप्रमुख हा आपल्या पत्नीच्या व कुटूंबातील इतर सदस्यांच्या मदतीने सामाजिक व धार्मिक कार्य पार पाडत होता. कुमारी कन्या ही पिता व आपल्या भावांच्या संरक्षणात राहत होती. कुटूंबात माता - पित्यांचा आदर

व सन्मान केला जाई. पिता व पुत्र यांच्यातील संबंध स्नेहपूर्ण असत. पित्याप्रमाणेच मातेचाही कुटूंबावर अधिकार चालत असे. पित्याच्या अनुपस्थितीत मोठा भाऊ कूटुंबाचे संरक्षण व पालनपोषण करीत असे. सर्वात प्रथम कुटूंबातील जेष्ठ पुत्राचा किंवा कन्येचा विवाह केला जात असे. घरी आलेल्या पाहुण्यांचा सत्कार करणे महत्वपूर्ण समजले जाई. कुटूंबाच्या सर्व संपत्तीचा अधिकार गृहप्रमुखाकडे असे. त्याच्या मृत्युनंतर हा अधिकार त्याच्या जेष्ठ पुत्राला प्राप्त होत असे. कुटूंबातील सर्व सदस्यांना पित्याच्या आज्ञांचे पालन करावे लागे.

कुटूंबप्रमुखाच्या निधनानंतर सर्व भाऊ एकत्रच राहात असत. पुढेमागे त्यांच्या वाटण्या झ ााल्यास पैतृक संपत्तीचे समान विभाजन होत असे. संपत्तीच्या विभाजनामध्ये स्मृतिकारांनी परस्परविरोधी मते दिलेली आहेत. जेष्ठ पुत्राला मोठा वाटा मिळावा असे मत असले तरी व्यवहारात ते रुढ नसल्याचे दिसते. पति-पत्नी संयोगातूनच कुटूंबाची निर्मिती होत असल्याने पत्नीच्या वेगळ्या अस्तित्वाची स्मृतिकारांनी दखल घेतलेली दिसत नाही. त्यामुळे तिचा वेगळा हिस्सा नाकारला आहे. मात्र पतीच्या संपत्तीमधून तिचा दान देण्याचा अधिकार मान्य केल्याचे दिसते.

**विवाह :**

हिंदू धर्मातील सोळा संस्कारात सर्वात महत्त्वाचा संस्कार म्हणजे विवाह संस्कार होय. गृहसुत्रात संस्काराच्या वर्णनाची सुरुवात विवाह या संस्कारापासून केली आहे. विशुध्द कामभावना मनुष्य व पशूंमध्ये नैसर्गिक आहे. मुक्त कामतृप्ती ही अमर्यादित पशू जीवनाची परिचर्या आहे. तसेच मर्यादित कामभावना ही मनुष्याची सृजनशीलता, सौंदर्यवृध्दी व परस्पर सहकार्याचे मूळ द्योतक आहे. काम व लैंगिक संबंधास मर्यादित रुप प्रदान करण्यासाठी संभवत: संस्कृतीच्या आदिम काळातच विवाह हा संस्कार प्रतिष्ठित झाला. पुत्रप्राप्ती करुन मनुष्य अमरत्व प्राप्त करु शकतो म्हणून अमरत्व प्राप्तीसाठी, आपल्या संततीच्या पालनपोषणासाठी मनुष्य हा एक सामाजिक प्राणी आहे. त्यामुळे तो एकाकी जीवन जगू शकत नाही. म्हणून धार्मिक समारंभ पार पाडण्यासाठी व पती - पत्नीतील निर्माण झालेले भावबंध या कारणामुळे मनुष्याला विवाहाची आवश्यकता निर्माण झ ाली आहे. भारतीय परंपरेत विवाह हा एक समारंभ पार पाडण्यासाठी व पती - पत्नीतील निर्माण झ ालेले भावबंध या कारणामुळे मनुष्याला विवाहाची आवश्यकता निर्माण झाली आहे. भारतीय

परंपरेत विवाह हा एक पवित्र संस्कार असून, ते ईश्वरीय बंधन आहे म्हणून हा संस्कार अटळ आहे. धर्मपालन करणे, प्रजा अर्थात पुत्रप्राप्ती करणे व रतिप्रयोजन हे विवाहाचे प्रमुख तीन हेतू होते. रतीप्रयोजनास दुसऱ्या शब्दात असे म्हणता  येईल की, मनुष्याच्या इंद्रिय लालसेला संकुचित करुन तिला मर्यादित करणे, प्राचीन भारतीय समाजात विवाहाचे  आठ प्रकार प्रचलित होते. ऋग्वेदात विवाह प्रकाराचा स्पष्ट उल्लेख मिळत नाही. तसेच विवाह विधीचेही  वर्णन आढळत नाही. आश्वालायन गृहसूत्रात विवाहाचे आठ प्रकार सांगितले आहेत.  हेच आठ प्रकार वाकाटक काळातही प्रचलित होते. हे आठ विवाह प्रकार पुढीलप्रमाणे होते.[२५]

**१) ब्राह्म विवाह :**

ब्राह्म विवाह हा सर्वश्रेष्ठ  विवाह प्रकार मानला जातो. यामध्ये कन्येचा पिता स्वेच्छेने आपल्या कन्येचा विवाह मुलाशी करुन देत असे.

**२) दैव विवाह :**

कन्येचा पिता यज्ञ करणाऱ्या पुरोहिताच्या प्रभावित होऊन आपल्या कन्येचा विवाह त्याच्याबरोबर करुन देत असे. अशा प्रकारे पुरोहिताला दक्षिणेच्या रुपात कन्या प्राप्त होत असे.

**३) आर्ष विवाह :**

कन्येचा  पिता मुलाकडून एक गाय व एक बैल घेऊन आपल्या कन्येचा विवाह त्याच्या बरोबर करुन देत असे. या गाय व बैलास यज्ञात बळी दिले जात असे.

**४) प्रजापत्य विवाह :**

प्रजापत्य हा विवाह प्रकार आदर्श मानला जातो. संतती निर्माण करणे हा या विवाहाचा प्रमुख हेतू आहे. या विवाह प्रकारात कन्येचा पिता विधिपूर्वक आपल्या कन्येचा विवाह मुलाबरोबर लावून देतो तसेच त्या वधू - वरांस सुखी जीवन व्यतीत करण्याचा आशीर्वाद देतो.

**५) गांधर्व विवाह :**

गांधर्व विवाह हा एक प्रकारे प्रेम विवाह होतो. या विवाहासाठी आई - वडिलांच्या परवानगीची आवश्यकता नसते. मुलगा व मुलगी यांच्यात प्रथम प्रेम निर्माण होते व त्यांच्यात

शारीरिक संबंध स्थापन होत असत. त्यानंतर ते विवाह करीत असत. स्त्री जीवन नष्ट होऊ नये यासाठी समाज या विवाहास मान्यता देत असे.

**६) असूर विवाह :**

असूर विवाह हा विवाह प्रकार क्रय - विक्रय पध्दतीवर आधारित होता. कन्येचा पिता मुलाकडून निश्चित मूल्य घेतल्यानंतरच आपल्या कन्येचा विवाह त्याच्याशी करुन देत असे. धर्मशास्त्रात या विवाह प्रकारची निंदा केली आहे.

**७) राक्षस विवाह :**

कन्येच्या इच्छेविरुध्द तिचे जबरदस्तीने अपहरण करुन तिच्याशी केल्या जाणाऱ्या विवाहाला राक्षस विवाह म्हणतात. कालांतराने हा विवाह प्रकार क्षत्रिय वर्णात लोकप्रिय झाला होता.

**८) पैशाच विवाह :**

हा विवाह प्रकार सर्वात कनिष्ठ समजला जातो. या विवाह प्रकारात निद्रामग्न, बेहोश, पागल व मद्यपेय घेतलेल्या कन्येशी धोका करुन किंवा जादू टोण्याच्या शक्तीच्या प्रभावाने शारीरिक संबंध ठेवले जातात. आधुनिक काळातील बलात्काराला पैशाच कर्म समजले जाते. स्त्रीबरोबर विवाह करण्यासाठी विवश केले जाते.

वरील आठ विवाह प्रकारात ब्राह्म प्राजापत्य विवाहास सर्वश्रेष्ठ व देव तसेच आर्ष विवाहास धर्मसंगत मानले आहे. काही विद्वानांनी गांधर्व विवाहास धर्मसंमत मानले आहे. काहींनी यास विरोध केला आहे. असूर, राक्षस व पैशाच विवाहास सूत्रकारांनी अधार्मिक म्हटले आहे. या आठ विवाह प्रकाराशिवाय समाजात प्रतिलोम विवाह सुध्दा प्रचलित होता. कनिष्ठ वर्णातील पुरुष व उच्च वर्णातील स्त्री यांच्यात झालेल्या विवाहाला प्रतिलोम विवाह म्हटले जाई. ब्राह्मणांना कोणत्याही वर्णातील स्त्रीशी विवाह करता येत असे. प्रतिलोम विवाहासंबंधी मनुस्मृतीमध्ये तीव्र नापसंती दर्शविली आहे. क्षत्रियांमध्ये प्रतिलोम, गांधर्वादि विवाह प्रकार रुढ होते. विवाह आपापल्या जातीतच करण्याची प्रवृत्ती होती. परंतु आंतरजातीय विवाहही होत असत. द्वितीय रुद्रसेन या ब्राह्मणजातीय वाकाटक राजपुत्राचा विवाह प्रभावती गुप्ता या वैश्य राजकन्येशी झाला होता.[२६]

या विवाहानंतर तिला किंवा तिच्या अपत्यांना कोणताही हलका दर्जा प्राप्त झाला नाही. ती आपल्या पतीची अग्नमहिषी ( पट्टराणी ) झाली व दिवाकरसेन व दामोदरसेन हे तिचे पुत्र यथाकाल विदर्भाच्या गादीवर बसले. दुसरा आंतरजातीय विवाह घटोत्कच लेण्यांतील लेखांत उल्लेखिला आहे. वल्लूरच्या विद्वान ब्राह्मण कुळांतील सोम याने ब्राह्मण व क्षत्रियजातीय स्त्रियांशी विवाह केला होता.[२७] ब्राह्मण स्त्रियांपासून त्याला झालेल्या पुत्रांनी वेदविद्येत पारंगत होऊन आपल्या वल्लूर कुलाला कीर्तिमान केले. क्षत्रिय पत्नीपासून झालेल्या रवि नामक पुत्राच्या ठिकाणी राजचिन्हे दिसत होती. त्याने सभोवरच्या सर्व प्रदेशावर आपला अंमल बसवला. तो पुढे वाकाटक राजाचा सचिव झ- ाला. त्याच्या वंशजांनीही वाकाटक राजांची सेवा एकनिष्ठपणे केली आहे. त्यापैकी शेवटच्या दोघांचे वर्णन अजंठा व गुलवाडा (घटोत्कच) येथील लेखांत आले आहे.

## आहार :

वाकाटक काळातील लोक शाकाहारी आणि मांसाहारी होते. त्यांच्या भोजनात विविध प्रकारच्या पदार्थाचा समावेश होत होता. दूध, दही, लोणी, तूप, तांदूळ, मूग, उडीद, गहू, तीळ, मीठ, साखर, हरभरा, मोहरी, कारले, गुळ खीर व विभिन्न प्रकारची फळे या पदार्थाचा प्राचीन लोकांच्या आहारात समावेश होता. तांदळाचा भात हा लोकांचा आवडीचा पदार्थ होता. या भातात अनेक पदार्थ मिसळून त्यांची खीर बनविली जाई. गहु व जवस यांच्या मिश्रणापासूनही खीर तयार केली जाई. दुधापासून अनेक पदार्थ बनविले जात. धान्य बारीक करुन अनेक पदार्थ तयार करीत व ते आवडीने सेवन केले जात असत. या पदार्थाशिवाय अनेक फळांचाही त्या काळात समावेश होता. द्राक्षे, आंबा, जांभूळ, बोर, व कंदमुळे ही फळे त्या काळात लोकप्रिय होती. दाळ व तेलाचाही आहारात समावेश होता. समाजात मांसाहार प्रचलित होता. बैल, भेड व बकरी या प्राण्यांचे मांस शिजवून सेवन केले जाई. अनेक प्रशुपक्षांचे मांस सेवन केले जात असे. या काळात मद्यपान केले जाई. अन्न व झाडाच्या रोपट्यापासून सूरा तयार करीत असत. त्यासाठी अन्न व झाडाच्या रोपट्याला सडविले जाई. तयार केलेली सुरा कातड्यापासून तयार केलेल्या पात्रात ठेवली जात असे. पेय पदार्थात सोमरस महत्त्वाचा असे. अथर्ववेद व स्मृती साहित्यात सुरापान व मद्यपानाची निंदा केली

आहे. तरीही सुरापान व मद्यपान या काळात प्रचलित होते. कवी कालिदासाच्या साहित्यात लोक मद्यपान करीत असल्याचे उल्लेख आढळतात.

## स्त्रियांचे स्थान व दर्जा :

वाकाटक काळात समाज व कुटूंबात स्त्रियांना सन्मानाचे स्थान होते. त्यांना पुरुषांची अर्धांगीनी समजले जात असे. त्यांच्याशिवाय पुरुषांचे जीवन अपूर्ण समजले जात असे. कवि कालिदासच्या कुमार संभव या ग्रंथत कन्येला कुटूंबाचा प्राण म्हटले आहे. शिक्षणाचा अधिकार मात्र फक्त श्रीमंत घरातील स्त्रियांनाच होता. स्त्रियांना सामाजिक व धार्मिक उत्सवात पतीबरोबर सहभाग घेता येत असे. पतीच्या आदेशाशिवाय कोणत्याच सामाजिक व धार्मिक उत्सवात सहभागी होता येत नसे हे मात्र खरे आहे. पत्नीला पतीची परमेश्वर म्हणून सेवा करावी लागे. वाकाटक राजा रुद्रसेन दुसरा यांची राणी प्रभावती गुप्ता ही उत्कृष्ट प्रशासक होती. समाजात बालविवाह, बहुपत्नीत्वाची प्रथा आणि सती प्रथा प्रचलित होती. वाकाटक काळात अनुलोम विवाह होत असत.[२८] उच्च वर्णातील पुरुष आणि त्या वर्णापेक्षा कनिष्ठ असलेल्या वर्णातील स्त्री यांच्यात झालेल्या विवाहाला अनुलोम विवाह म्हणतात. अनुलोम विवाहाचे प्रमाण या काळात अत्यंत कमी झाले. बहुपत्नीत्व आणि सती प्रथाही केवळ श्रीमंत लोक, राजघराणे आणि उच्च वर्णीय लोकांतच प्रचलित होती. या काळात स्त्रियांच्या स्थितीतही परिवर्तन झाले. वैदिक काळात स्त्रियांना असलेली सन्मानाची स्थिती या काळात राहीलेली नव्हती. मुलीपेक्षा मुलगा जन्माला येणे महत्वाचे समजले जाऊ लागले. त्यामुळे साहजिकच मुलगी जन्माला येताच दु:ख व्यक्त केले जाई. वयाच्या आठव्या व नवव्या वर्षीच मुलीचे लग्न करण्यात येत असे.[२९] बालविवाह प्रथा प्रचलित असली तरी किमान उच्चवर्णीयात तरी विधवांचे पुनर्विवाह होत नव्हते. पडदा पध्दती आस्तित्वात नव्हती. केवळ उच्चवर्णीयातील आणि राजघराण्यातील स्त्रियांनाच शिक्षण देण्यात येई. सर्वसामान्य स्त्रिया शिक्षणापासून वंचित होत्या. त्यांच्यावर पतीची बंधने आली. त्यांना फारसे स्वातंत्र्य राहिले नाही. पतीच्या उत्पन्नातील त्यांच्या वाट्यास हळूहळू मान्यता मिळू लागली होती. पतीच्या आज्ञेबाहेर जाऊन पत्नी स्वतंत्रपणे वागू शकत नाही. पतीची उपेक्षा करणाऱ्या स्त्रियांसाठी याज्ञवल्क्याने व कौटिल्याने त्यांचे नाक व कान कापण्याची भिक्षा फर्माविली, तर मनूने तिला मृत्यूदंडाची शिक्षा फर्माविली.

## अलंकार :

वाकाटक काळात स्त्री - पुरुषांना अलंकाराची फार आवड होती. अजिंठा वेरुळ, शिऊर व घटोत्कच लेण्यांतील शिल्पकला आणि अजिंठा लेणीतील चित्रकलेवरुन या काळातील अलंकाराची आपणास कल्पना येते. कवि कालिदासच्या साहित्यातुनही अलंकाराची माहिती होते. अलंकार व सौंदर्यप्रसाधने ही स्त्री - पुरुषांच्या सौंदर्यात भर टाकणारी महत्वाची साधने आहेत. त्यामुळे स्त्री - पुरुषांना विभिन्न प्रकारचे अलंकार व विभिन्न प्रकारची सौंदर्यप्रसाधने वापरण्याची आवड होती. कानातील कुंडले, गळ्यात स्वर्णहार व मण्याच्या माळा, दंडात बाजुबंद ( भुजबंध ), दणकड्या, गजरे, अंगठी, पायात पैंजन, कमरपट्टा इत्यादी अलंकार वापरत असत. विवाहप्रसंगी स्त्रिया वेगवेगळे अलंकार वापरत असत. सोने, चांदी, शंख व शिंपल्यापासून आणि मोती - हिऱ्यापासून विभिन्न प्रकारचे दागिने तयार केले जात असत.

अजिंठा लेणीतील चित्रात व्यापारी, सामान्य व गरीब लोक यांच्या अंगावर दागिने दिसत नाहीत पण राजे,राण्या, राजपुत्र, उच्चपदस्थ अधिकारी, श्रीमंत लोकांच्या स्त्रिया, त्यांच्या दासी यांनी विविध प्रकारचे अलंकार घातलेले आढळून येतात. राजे लोक उंच रत्नजडित मुकूट त्यांच्या कानात रत्नजडित कुंडले व गळ्यात रत्नांचे व मोत्यांचे अनेक हार असत.[३०] बाहूवरच्या रत्नयुक्त अंगदांना मोत्यांचे लोंबते पदर लावले असत. इंदुमतीस्वयंवरात एका राजाने आपल्या रत्नजडित अंगदाच्या टोकांत अडकलेला हार पुन: व्यवस्थित करुन ठेवल्यांचे वर्णन कालिदासाने केले आहे. हातात एक दोन सुवर्णवलये असत. रामगिरीवर प्रियाविरहाने कृश झालेल्या यक्षाच्या मनगटांतून कनकवलये गळून पडल्यामुळे ती मनगटे रिक्त दिसू लागली असे वर्णन मेघदूतांत आले आहे. बोटांत अंगुलीयकें ( अंगठ्या ) घालत. शाकुंतलात दुष्यन्ताने शकुंतलेला दिलेले अंगुलयक हरवल्यामुळे झालेला घोटाळा सर्वविदित आहे. वक्ष:स्थलावर यज्ञोपवीता सारखा घातलेला अनेक पदरांचा मोत्यांचा हार असे. त्याला मुक्ता वैकक्षक म्हणत. सतराव्या लेण्यांतील बुध्दाच्या धर्मोपदेशाच्या वेळी जमलेल्या राजांचे किंवा त्याच लेण्यातील आकाशातून उडणाऱ्या इंद्राचे चित्र पाहिले असता तत्कालीन श्रीमंत लोकांच्या अलंकाराची कल्पना येते. मुलांचेही अलंकार बहुतांशी याच प्रकारचे असत. हे यशोधरा व राहुल बुध्दाला सामोरे जातात त्या चित्रावरुन दिसून येते.

स्त्रियांचे अलंकार अत्यंत सुंदर व विविध प्रकारचे असत, अजिंठ्याच्या बहुतेक चित्रांत स्त्रियांनी आपल्या केसांत सध्याच्या बिंदू - सारखा अलंकार घातलेला दिसतो. त्याला ललाटिका म्हणत, कारण तो ललाटावर ( कपाळावर ) केसांत सभोवार बांधला जात असे.[३१] त्याचा एक पदर सीमन्त किंवा भांग याच्या अनुरोधाने जोडला जात असे, म्हणून यांचे वर्णन बाणाने सीन्तचुम्बि तिलकमणि असे केले आहे. या ललाटिकेला पुढील भागी मोत्यांचा झुपका किंवा रत्नजडित सोन्याचे पदक जोडत असत. ते भालप्रदेशावर लोंबत असे, म्हणून त्याला चटूला तिलक अशी संज्ञा असे. सोन्याच्या साखळीत नाना प्रकारची रत्ने ओवून ललाटावर लोबता टेवलेल्या अलंकाराला चटूलातिलक म्हणतात. शिरोभूषण स्त्रियांप्रमाणे मुलेही धारण करीत. यशोधरा व राहुल या दोघांनीही ते घातले आहे. काही स्त्रिया मोत्यांचे जाळे कंसात घालत. त्याचे वर्णन कालिदासाने मुक्ताजालग्रथितमल अशा शब्दांनी केले आहे. गळ्यात नाना प्रकारचे एक किंवा अनेक पदरांचे हार घालत. काहीत मोत्यांच्या एकसरांत मध्ये मोठा इंद्रनीलमणि बसविला असे. त्याचा उल्लेख कालिदासाने आपल्या मेघदूतात एक मुक्तागुणमिवः भुवःस्थूलमध्येन्द्रनीलम् असा केला आहे.[३२] काही कंठिकेत ( गळसरीत ) माणिक व पाचू ही रत्ने ओवली जात असत, तसेच काही सोन्याच्या पुतळ्यांच्या बनविल्या असत. त्यांना निष्ककण्ठी असे नाव असे. प्राचीन काळची अनेक भारतीय व परदेशी सोन्याची नाणी वरच्या भागी भोक पाडलेली सापडली आहेत. ती अशा निष्ककण्ठ्यांत ओवली जात असावी हे उघड आहे.

अजिंठ्याच्या लेण्यांत कोठेही स्त्रीयांच्या नाकांत नथ दिसत नाही. त्यामुळे त्यावेळी नथ घालण्याचा प्रघात नव्हता हे उघड आहे. कानांत मात्र वाटोळी मोठी कुंडले घालीत. बाहूंवर कोपराच्या वर रत्नजडित केयूर असे. त्याला मोत्याचे लोंबते पदर लावले असत. हातात अनेक वलये घालत. यशोधरेने आपल्या हातात या वलयांशिवाय वर्तुळाकार कड्यांचा बनविलेला अलंकार सध्याच्या पाटलीच्या जागी घातला आहे. कमरेत नाना प्रकारच्या रत्नांनी बनविलेल्या अनेक पदरी रशना असत. त्यांना मणिमेखला म्हणत. काही रशनांना बारीक सोन्याच्या किंकिणी लावत, तेव्हा त्यांना कांची असे म्हणत. स्त्रियां घरांत फिरतांना या कांचीच्या आवाजाने हंसांना आकृष्ट करीत, असे वर्णन कवि कालिदासाने केलेले आढळते. पायात एक दोन वलये घालत असत.

## सौंदर्य प्रसाधने :

स्त्री - पुरुषांना विभिन्न प्रकारची सौंदर्यप्रसाधने वापरण्याची आवड होती. सुगंधी तेल, अंजन, अंगराग, लेपन व सुवासिक शृंगार सामग्रीच्या आणि ओठाला लावण्यात येणाऱ्या रंगाचा सौंदर्यप्रसाधने म्हणून उपयोग केला जात असे. या प्रतिमेचे अवलोकन केल्यास लेण्यातील चित्रकलेचे स्त्रियांच्या अलंकाराची आणि त्या वापरत असलेल्या सौंदर्यप्रसाधनांची कल्पना येते. या स्त्रिच्या ओठाला लावलेला सोनेरी रंग स्पष्ट दिसतो. सौभाग्याचे प्रतीक म्हणून स्त्रिया आपल्या भागात सिंदुर भरत असत.

## शिक्षण :

चारित्र्यसंवर्धन, व्यक्तिमत्वाचा विकास, कर्तव्यपरायणता व संस्कृतीसंवर्धन ही प्राचीन काळातील शिक्षणाची उद्दिष्ट्ये होती. या काळात पाठांतर पध्दतीने गुरुगृही शिक्षण देण्यात येत असे. पदपाठ, सूत्रपाठ, जयपाठ व धनपाळ अशा पाठांतराच्या चार पध्दती होत्या. गुरु मौखिक व चिंतनपर अशा दोन अध्यापन पध्दतीचा अवलंब करीत. वेद, ब्राह्मणे, आरण्यके, उपनिषदे, वेदांगे, गणित, इतिहास, भुगोल, खगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र, पुराणे, नीतीशास्त्र, व्याकरण व भाषाशास्त्रया विषयाचे शिक्षण देण्यात येत असे.[३३] ब्राह्मण, क्षत्रीय व वैश्यांना शिक्षणाचा अधिकार होता. ब्राह्मण विद्यार्थ्यास वरील सर्व विषय शिकविले जात असत. क्षत्रियांना वरील विषयाशिवाय अन्विक्षिकी, वार्ता व दंडनितीचा अभ्यास करावा लागे. वैश्य विद्यार्थ्यांना वरील शिक्षणाशिवाय आपल्या व्यवसायाचेही शिक्षण दिले जात असे. बौध्द शिक्षण पध्दतीत प्रवज्या विधिनंतर मुलाच्या शिक्षणाचा प्रारंभ होत असे. या विविधप्रसंगी त्या मुलाचे केशवपन करण्यात येऊन त्यास पिवळी वस्त्रे परिधान करावी लागत असत. बौध्द विहारात दिल्या जाणाऱ्या शिक्षणात वैदिक साहित्य, त्रिपीटके, जैन साहित्य, तर्कशास्त्र, तत्वज्ञान, साहित्य, व्याकरण, तर्कशास्त्र, न्याय, वैद्यक, दर्शन, योग व जातके या विषयांचा समावेश होता.[३४] बौध्द शिक्षण केंद्रानाही सम्राट आणि व्यापारी लोक दान देत असत. बौध्दाप्रमाणेच जैन लोकांनीही शिक्षण चळवळीवर भर दिला. त्यांनी धर्माचरण, संस्कृतीसंवर्धन आणि व्यक्तीमत्वाचा विकास यावर भर दिला होता. पैठण, नांदेड, कंधार, अजिंठा औरंगाबाद, वेरुळ, वत्सगुल्म, नंदिवर्धन व रामटेक ही याकाळातील शिक्षणाची केंद्र होती.

गुरुकूल ही प्राचीन शिक्षण संस्था होती. गुरुकूल नगराच्या बाहेर वनात असे. गुरुकूल हेच शिक्षणाचे सर्वप्रथम केंद्र होते. गुरुकूलाशिवाय राजधानी, तीर्थस्थळे, बौध्द विहार, जैन मंदिरे, हिंदू मंदिरे, मठ व अग्रहार ग्राम ही सुध्दा शिक्षणाची केंद्रे होती.[३५] राजे - महाराजाकडून विद्वान ब्राह्मणांना विद्यादानासाठी दान दिलेल्या गावाला अग्रहार म्हणत असत. अग्रहारात शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाची व्यवस्था अग्रहार मार्फत मोफत केली जाई.

## मनोरंजन :

याकाळातील लोकांना विविध मनोरंजनाच्या साधनाद्धारे मनोरंजन करुन घेण्याची आवड होती. मनोरंजनाची साधने विविध प्रकारची होती. नृत्य, संगीत, शिकार करणे, रथदौड, द्युतक्रिडा, जुगार ,खेळणे, मल्लयुध्द, मुष्ठीयुध्द, गायन, ढोल, शततंतू, झांज, मृदंग वीणा, खंजिरी, बासरी, दुदूंभी, पणव व शंख ही वाद्ययंत्रे, घोडदौड, नाट्यअभिनय, मूक अभिनय, विदुषक, लीला, चारणगीत, रज्जूनर्तन, सांडाचे युध्द, मनुष्य व पशूच्या लढाई, नंट मदारीयाचे कलाप्रदर्शन, वादक, वाग्वीजक, नरनर्तक, नक्षाच्या झुंजी, कोंबड्याच्या झुंजी, होळी प्रमाणे रंग पंचमी खेळणे. मेंढ्याची टक्कर, पोहणे, नौका विहार, जल क्रीडा, झोके खेळणे, शरसंधान, विटीदांडू व धावणे ही मनोरंजनाची साधने होती. स्त्रिया रंग शिंपडणे, गायन, वादन, नाचगाणी, फुगडी, सोंगट्या, गंजीफा, सारीपाट व लपंडाव यासारखे खेळ खेळत असत.[३६] मैदानी, मर्दानी व बैठे खेळ हेही मनोरंजनाचे महत्त्वाचे साधन होते. मर्दानी खेळात मल्लयुध्द, शिकार, द्वंद्व, रथशर्यती, पोहणे, शरसंधान, विटीदांडू, कोंबड्यांची झुंज आदींचा समावेश होता, तसेच स्त्रियांच्या खेळांत सोंगट्या, फुगडी, रंग शिंपडणे, गायन, वादन, नृत्य, गंजीफा, सारीपाट आदि खेळ मोडत असत. द्वंद्व, रथदौड, शिकार, धावणे व पोहणे ही सुध्दा मनोरंजनाची साधने होती.

## पोषाख :

अजिंठा लेणीतील मुर्तिशिल्प आणि चित्रावरुन वाकाटककाळातील स्त्री - पुरुषांच्या पोषाखाची अर्थात वस्त्राची कल्पना येते. पुरुष फेट्यासारखे उष्णीय आणि कमरेखाली धोतर नेसत असत. धोतर कधी कधी निरी घालूनही वापरले जात असे. दरबारातील पुरुष बंदिस्त अंगरखा व तंग पायजमा घालीत असत. पुरुष डोक्यावर शिरस्त्राण वापरीत असत. स्त्रिया कमरेच्यावरील उत्तरीय

म्हणजे ओढणीसारखे वस्त्र व कमरेखालील लुंगीसारखे वस्त्र वापरत असत. याशिवाय चोळी, साडी, कंचुकी व पायजमा घालीत असत. स्त्रि - पुरुषांना विभिन्न प्रकारची रंगीबेरंगी कपडे वापरण्याची आवड होती. श्रीमंत लोक तलम व रेशमी वस्त्रे वापरत असत. अजिंठा लेणीतील चित्रकलेत बहुतेक स्त्री-पुरुष अधोवस्त्र नेसलेले दिसतात. हे वस्त्र भिन्न भिन्न रंगाच्या पटट्याचे असे. पवनार येथे सापडलेल्या शिल्पपट्टांतील राम, लक्ष्मण, भरत व सीता यांची वस्त्रेही याच प्रकारची आडव्या पटट्यांची दाखविली आहेत, पण ती जास्त रुंद जवळ जवळ घोट्यापर्यंत खाली आलेली दिसतात. या वस्त्राचा एक शेवट डाव्या मांडीवरुन जाऊन त्याचा मागे कच्छ ( कासोटा ) होत असे. दुसरा शेवट दोन्ही मांड्यांना मागून पुढून वेष्टून नंतर मागे खोवून खाली शेपटासारखा लोंबत असे. या प्रकारच्या परिधान पध्दतीत पुढील भागी निऱ्या दिसत नसत, पण पाठीमागे मात्र अधोवस्त्राचा शेवट शेपटासारखा लोंबत असत.[३७] उत्तर हिंदूस्थानातील अन्तरीयक नेसण्याची पध्दत याच्या उलट होती. त्याच्या निऱ्यांचे सोगे पुढे सुटलेले सांची व भरहूत येथील शिल्पांत आढळतात. अजिंठ्याच्या वाकाटककालीन लेण्यांत अशा तऱ्हेच्या पुढील निऱ्या कोठेही दिसत नाहीत, पण मागील शेपटासारखे सोगे मात्र अनेक ठिकाणी दाखविले आहेत.

स्त्रियांचीही अधोवस्त्र नेसण्याची पध्दत याच तऱ्हेची होती, हे काही चित्रांत त्या पाठमोऱ्या बसल्या किंवा उभ्या असता त्यांच्या खाली लोंबणाऱ्या कासोट्यावरुन दिसते. काही स्त्रिया मात्र अधोवस्त्र कच्छरहित पध्दतीने नेसत असत हेही अजिंठ्याच्या लेण्यांतील चित्रावरुन स्पष्ट होते. काही पुरुष हल्लीच्या हाफपँट सारखा मांडचोळणा घालीत व तो कटिबंधाने कमरेत बांधत. त्याला चंडातक असे म्हणत.[३८] सतरा क्रमांकाच्या लेण्यातील उजव्या भिंतीजवळच्या खांबावरील यक्ष अशा तऱ्हेचे चंडातक नेसला आहे. बाणाच्या हर्षचरितांतील वर्णनावरुन स्त्रियाही अशा तऱ्हेचे चंडातक नेसून त्यावर पायघोळ कंचुक किंवा झगा घालत असे दिसते. पुरुष घोड्यावर बसतांना किंवा शिकारीला गेले असता तुमान घालून वर पूर्ण ब्राह्यांचा गुडघ्यापर्यंत खाली आलेला कोट घालत असे दिसते. सतराव्या क्रमांकातील लेण्यांत मृग जातकांत शिकारीला गेलेल्या राजाचा पोषाख या तऱ्हेचा आहे. अनेक नाण्यांवर गुप्तनृपतीचा पोषाखही याच तऱ्हेचा आहे, काही चित्रांत नोकरांनीही पूर्ण बाह्यांचे अंगरखे घातलेले आढळतात.

पुरुष सामान्यत: उत्तरीय वापरीत. ते जानव्याप्रमाणे डाव्या खांद्यावरुन व उजव्या काखेखालून जाई. त्यामुळे उजवा हात मोकळा राहत असे. काही चित्रांत हे उत्तरीय पुन: दुमडून डाव्या खांद्यावर टाकलेले दिसते. काही लोक उत्तरीयाची पट्टी करुन ते वैकक्षकासारखे वापरीत तसेच इतर काही ते कमरेला बांधून बध्दपरिकर होत. म्हैसूरच्या राजदरबारांत सर्व सेवकांनी अशा रीतीने बध्दपरिकर होऊन राहिले पाहिजे असा नियम होता. काही लोक एकच लांब वस्त्र नेसून त्याचाच नंतर उत्तरीयासारखा उपयोग करीत. काही पुरुष पूर्ण बाहयांचा अंगरखा घालून वर उत्तरीय पांघरत. सतराव्या लेण्यांच्या हंसजातकांतील प्रधानाचा पोषाख या तऱ्हेचा आहे.

काही स्त्रिया आपल्या स्तंनावर रुंद पट्टी बांधत असत. अशा पटट्यांना पयोधरपट असे म्हणत.[३९] मरणोन्मुख सुंदरीच्या चित्रांत तिला पंख्याने वारा घालणाऱ्या स्त्रीने अशा तऱ्हेचा पयोधरपट वापरलेला दाखविला आहे. विश्वन्तर जातकाच्या चित्रांत जूजक राजदरबारांत पैसे घेतो. त्यावेळी राजाजवळ बसलेल्या राणीनेही असाच पयोधरपट धारण केला आहे. शाकुंतल नाटकांत शकुन्तला प्रियवंदेने आपले वल्कल घट्ट बांधले आहे, अशी तक्रार करते. त्यावर प्रियवंदा म्हणते, पयोधर विस्तारयितृकमात्मनो योवनमुपालभस्व ( स्तन मोठे करणाऱ्या आपल्या यौवनाला दोष दे ), असा प्रसंग कालिदासाने घातला आहे. त्या ठिकाणीही पयोधरपट विवक्षित आहे यात संशय नाही. या पटाची गाठ पाठीवर बांधीत असल्यामुळे ती सैल करण्याकरिता शकुंतलेला आपल्या सखीची मदत घ्यावी लागली, हे उघड आहे. चोळी ( कुर्पासक ) घालण्याचा प्रघात सार्वत्रिक होता असे दिसत नाही. तथापि काही स्त्रिया तिचा उपयोग करीत यात संशय नाही. सोळा क्रमांकाच्या लेण्यांतील चित्रात मायादेवी शुध्दोदन राजाला आपले स्वप्न सांगत आहे त्या ठिकाणी जवळ उभ्या राहिलेल्या स्त्रीने चोळी घातलेली दाखविली आहे.[४०] तसेच सतराव्या लेण्यांतील विश्वंतर जातकाच्या एका चित्रांत दान मागण्यासाठी अनेक याचक जमले आहेत. त्यामध्ये कडेवर मूल असलेल्या एका स्त्रीने वर रंगीत फुले काढलेली चोळी किंवा अर्धबाह्यांचे जाकीट घातल्याचे दाखविले आहे. याच लेण्यांतील सिंहलावदानांत तर हल्ली महाराष्ट्रीय स्त्रिया घालतात त्याप्रमाणे खणांची हिरवी चोळी घातलेली एक स्त्री दाखविली आहे. परदेशी शक व कुशाण जातीच्या स्त्रिया चोळीऐवजी

अर्धबाह्याचे जाकीट घालत असे दिसते. सतराव्या लेण्यांतील एका चित्रांत त्या प्रकारच्या स्त्रीचे चित्र रंगविले आहे.

मुलांची नेसण्याची पध्दत पुरुषांच्या सारखी असे हे सिध्दार्थ ( गौतम ) याच्या बाळपणाची चित्रे सोळाव्या लेण्यांत काढली आहेत. त्यावरुन स्पष्ट होईल. काही मुलांच्या अन्तरीयाचे मागचे शेपटे स्पष्ट दिसतात. काहीनी उत्तरीयासारखा स्कार्फ खांद्यावर टाकलेला दिसतो. सिध्दार्थ शाळेत शिकत असता त्याने पूर्ण बाह्यांचा अंगरखा घातलेला दाखविला आहे, तर त्याच्या काही मित्रांच्या कमरेच्या वरचा भाग उघडङ्गि आहे.

ज्ञानप्राप्तीनंतर गौतम बुध्द तीन वस्त्रे वापरीत असे.[४१] १) अन्तरावासक

(याला ह्युएनत्संग निवासन म्हणतो ) किंवा अधोवस्त्र, हे कमरेत पटट्याने बांधले अस; २) उत्तरासंग, याचे दुसरे नाव संकक्षिका असावे. बाणाने उत्तरासंगाचा उल्लेख केला आहे. हे उत्तरीयासारखे पांघरले जात असे ; आणि ३) संघाटी किंवा लांब अंगरखा. अजंठ्याच्या लेण्यांत काही ठिकाणी गौतम बुध्दाने उत्तरासंग पांघरले आहे, तर काही ठिकाणी पायघोळ अंगरखा घातला आहे, असे दिसते.

## केशरचना :

वाकाटक काळातील स्त्री - पुरुषांच्या केसरचनेची माहिती आपल्याला अजिंठा लेण्यातील चित्रकलेवरुन होते. स्त्रिया विविध प्रकारची केशरचना करीत असत. त्या आधुनिक स्त्रियाप्रमाणे वेण्या घालत असत. अनेक पेडांच्या वेण्या आणि साधी भांगवेणी घालण्यात येई. कधी कधी केस डोक्यामागे घेऊन त्यास पंख्याचा आकार दिला जाई. तसेच सर्व केस एकत्र सुध्दा बांधण्यात येत असत. त्यासाठी मोत्याच्या

झालरीचा उपयोग करण्यात येत असे. अजंठ्याच्या चित्रांत स्त्रीपुरुषांची विविध प्रकारची केशरचना व शिरोभूषण दिसतात.[४२] सोळा व सतरा लेण्यांतील चित्रांत कोठेही पुरुषांनी शिरोवेष्टने किंवा पागोटी घातलेली आढळत नाहीत. राजे लोक डोक्यावर रत्नजडित उंच मुकुट घालीत. तसेच रुंद सोन्याचा पट्ट कपाळावर बांधून राजत्व दाखविले जाई. इतर मंत्री, अधिकारी व सामान्य जन आपले केस मानेवर, पाठीवर किंवा छातीवर सोडीत. काही लोक केसांवर कापडाची किंवा रेशमी वस्त्राची

पट्टी बांधत. तिचे वर्णन बाणाने धौतदुकूलपट्टिकापरिवेष्टितमौलि: अशा शब्दांनी केले आहे. सतराव्या लेण्यांत बुध्द धर्मोपदेश करीत असतां त्यांच्या श्रोतवृंदामध्ये बिंबिसार राजाजवळ बसलेल्या एका उच्च दर्जाच्या पुरुषाने अशी शुभ्र दुकूलपट्टिका बांधली आहे. तिच्या खाली त्याचे केस लहान लहान झुपक्यांनी कपाळावर पडलेले दिसत आहेत. दिसत आहेत. परकीय शक, कुशाण व पल्हव राजांपैकी काहीच्या डोक्यावर वर निमुळते होत गेलेले टोप आहेत. तसेच काहीनी रुंद वाटोळ्या टोप्या घातल्या आहेत. ब्राह्मणांच्या डोक्यावर शेंडीची गाठ असे. तशीच गाठ सिध्दार्थाच्या सहाध्यायी मुलाच्या डोक्यावर दाखविली आहे. काही मुलांच्या कानावर झुलपे ( काकपक्षक ) आहेत. अशी पांच

झुलपे ठेवण्याचा प्रघात होता, काही शिल्पांत पूर्णभद्र, पत्रिक वगैरेच्या डोक्यावर हल्ली न्यायाधीश केसांची टोपी ( विग )घालतात तशी केशरचना दिसते.[४३] बौध्द भिक्षु केशकर्तन करीत असत, पण अजिंठ्याच्या चित्रांत सर्वांनी पूर्णपणे मुंडन केलेले दिसत नाही. श्रावस्ती येथे बुध्दाने चमत्कार दाखवून नग्न क्षपणकांना निरुत्तर केले त्या प्रसंगाच्या चित्रांत ते क्षपणक मात्र मुंडितशिर दाखविले आहेत. गौतम बुध्द, ऋषि, मुनि वगैरंच्या डोकीवर जटा आहेत.

स्त्रियांची केशरचना विविध प्रकारची असे. अजिंठ्याच्या लेण्यांत स्त्रियांच्या केशरचनेचे व शिरोभूषणांचे अनेक विविध व सुंदर प्रकार दिसतात की त्यांनी प्रेक्षकांचे मन आश्चर्यचकित होते. अजिंठ्याच्या सोळा व सतरा क्रमांकाच्या लेण्यांत बहुधा कोठेही स्त्रियांनी डोकीवरुन पदर घेतलेला किंवा अवगुंठन ( बुरखा ) केलेले दिसत नाही.[४४] क्वचित परकी दासदासीनी डोकीवर टोकाची वाटोळी टोपी घातली आहे. सतराव्या लेण्यांतील एका चित्रांत अशा ओबडधोबड चेहऱ्याच्या दासीच्या डोकीवर तुरा असलेली उंच वाटोळी टोपी आहे. फक्त एका ठिकाणी बुध्द धर्मोपदेश करीत असता त्याच्या श्रोतृवर्गात बसलेल्या एका पार्शियन स्त्रीने कशिदा काढलेली टोपी घातली आहे, तिला सफेद जाळीचा पडदा लावला आहे असे श्री यजदानी म्हणतात. हा अपवाद सोडला तर इतर कोठेही स्त्रियांचे अवगुंठन दिसत नाही. हल्लीही महाराष्ट्रात हीच पध्दत आहे. परंतु आज महाराष्ट्रीयन स्त्रिया कपाळावर कुंकू किंवा तिलक लावतात तसे मात्र या लेण्यांतील चित्रांत कोठेही दिसत नाही. दहाव्या लेण्यांतील चित्रांत पुरुषांच्या डोकीवर पागोटे, स्त्रियांच्या डोकीवर पदर व

भालप्रदेशावर मोठा वाटोळा तिलकआढळतो. तसेच पुरुषाच्या व स्त्रियांच्या वस्त्रांच्या निऱ्या व सोगे पुढे सोडलेले आढळतात.

## घरे :

वाकाटक काळातील घरे विटा, चिखल, माती आणि गवताची असत. श्रीमंत लोक आणि गरिब लोकांची घरे यांच्यात फरक होता. श्रीमंत व गरीब लोकांची घरे ही बांधण्याकरिता दगडमातीचा उपयोग सर्रास केला जात होता, असे दिसत नाही. अजिंठ्याच्या उपरिनिर्दिष्ट लेण्यांतील चित्रावरुन तत्कालीन राजवाडे, घरे, दुकाने वगैरे लाकडाची असत, असे दिसते.[४५] बौध्द लोकांची चैत्य वाकाटककाळात व तत्पुर्वीही पर्वतात कोरली जात असत. पण त्यात अनावश्यक असलेल्या तुळ्या, कड्या वगैरेही कोरल्या जात . त्यावरुन त्यामध्ये तत्पूर्वीच्या लाकडी चैत्याचे अनुकरण केले होते हे स्पष्ट दिसते. किंबहूना कार्ल्यासारख्या काही अत्यंत प्राचीन चैत्य लेण्यांत अद्यापी काही लाकडी भाग अवशिष्ट आहेत, त्यावरुनही ही गोष्ट स्पष्ट होते.

अजिंठ्याच्या लेण्यांतील चित्रांवरुन तत्कालीन राजवाडे व श्रीमंत लोकांची उंच लाकडी खांबावर उभारली असत असे दिसते. हे खांब तीन ठिकाणी, खाली, मध्यभागी व शिरोभागी, कोरीवकामाच्या किंवा रंगाच्या पटट्यांनी सुशोभित केलेले असत. त्यांच्या खाली उथळ्या असत. वरील शीर्षके ( Capitals ) गोल, चपट्या किंवा उभट आकाराची असत. छावणीवर चैत्यवातायनाच्या आकृतीनी दिवाणखान्यांना ( आस्थानमंडपांना ) शोभिवंत केले जाई. दिवाणखाने बहुदा चौकोनी, काही ठिकाणी गोल आकाराचे असत. सोळा क्रमांकाच्या लेण्यांत जेथे शुध्दोदन राजाला मायादेवी आपले स्वप्न सांगत आहे तो दिवाणखाना वाटोळा दाखविला आहे. दिवाणखान्यात भिन्न भिन्न रंगाचे पडदे सोडून त्यांना सुशोभित करण्यात येई. काही घरांवर त्रिकोनी छपराचे कबुतरखाने असत. त्याचे वर्णन कालिदासाने आपल्या मेघदूतात तो कस्यांचिदवनालमौ सुप्तपारवतायां नीत्वा रात्रिक इत्यादी शब्दांनी केले आहे. राजवाड्याच्या एका भागांतून दुसऱ्या भागांत जाण्याकरिता जे दरवाजे असत त्यावर लांबट पिपाच्या आकाराचे ( Barrel shaped ) छप्पर असे व त्याला दोन्ही बाजूंनी चैत्यवातायनांच्या आकृतींनी सुशोभित केलेले असे. जरुर तेव्हा खांबावर शामियाने ( उपकार्या ) व तंबू (पटमंडप) उभारले जात. त्यांचा उल्लेख कालिदासाच्या

रघुवंशात विदर्भराजाने केलेल्या अजाच्या स्वागताच्या वर्णनात आला आहे. दुकाने लहान लहान व चौकोनी असून त्यांच्या पुढील बाजूत उन्हापावसापासून संरक्षण करण्याकरिता बासावर कापडाच्या किंवा तट्ट्याच्या झापड्या लावत. गरिबांची घरे हल्लीप्रमाणे गवताच्या छपरांची असत.

दिवाणखान्यांतील सामान ( फर्निचर ) साध्या प्रकारचे असे. बसण्यास चौरंगासारखे कातीव पायांचे मंच असत. त्यांना पाठीमागे टेकण्याकरिता गोल आकाराची पाठ व पुढे पाय टेकण्याकरिता पादपीठ असे. मंचावर टेकण्याकरिता हल्लीसारखे वाटोळे लोड असत. सैपाक घरात शिंक्यावर एकावर एक भांडी रचून ठेवण्याची पध्दत हल्लीप्रमाणेच प्रचलित होती. भोजन करताना बसण्यास चौरंग व पुढे ताट ठेवण्याकरिता वाटोळ्या आकाराचे लहानसे मेज असे.

## मानवाची शरीररचना :

वाकाटक काळातील मानवाच्या शरीररचना, आंतरजातीय रचनेची, अनेक समाजातील विभिन्न वंशाची कल्पना आपल्याला अजिंठा लेण्यातील चित्रावरुन येते. येथील काही लोक काळ्या वर्णाचे, खुजे व चपट्या नाकाचे असे दाखविले आहेत. हे या प्रदेशांतील मूळचे आदिवासी होत. काही नागवंशी होते. अजिंठ्याची लेणी ज्यांनी कोरली ते या वंशाचे असावेत. म्हणूनच त्यांनी अनेक लेण्यांत डोक्यावर फणा असलेल्या नागराजांची शिल्पे कोरली आहेत व चित्रे काढली आहेत. राजे, राण्या, ब्राह्मण, दास, दासी वगैरे आर्य वंशाचे लोक सर्वत्र आढळतात. हे गौरवर्णी, उंच व देखणे आहेत. याशिवाय शक, कुशाण, पल्हव, ग्रीक वगैरे परदेशी लोकही महाराष्ट्रांत येऊन स्थायिक झाले होते. त्यांची चित्रेही काही ठिकाणी आढळतात. सतरा क्रमांकाच्या लेण्यांत बुध्द धर्मोपदेश करीत असतां त्याच्या श्रोतृवर्गात बिंबिसार, अजातशत्रु, वगैरे राजांबरोबर
काही दाढी मिशा असलेले, डोक्यावर उंच निमुळता टोप आणि अंगात पूर्ण बाह्याचे कोट घातलेले काही पुरुष बसलेले दाखविले आहेत. ते या परदेशी वर्गाचे प्रतिनिधी असावे. त्याशिवाय एकदोन ठिकाणी रुंद चेहऱ्याचे बारीक मिशा व डोळे असलेले व लांब अंगरखा घातलेले असे पुरुष दिसतात, ते चिनी असावेत.

## संगीत व प्राणी :

वाद्यांपैकी मृदंग, शंख, झांज, मुरली, एकतारी किंवा दोनतारी यांची चित्रे आहेत. मृदंग गळ्यांत पट्टयांनी समोर बांधून वाजविला जात असे. जनावरांपैकी हत्ती, घोडे, गाय, बैल, वाघ, सिंह, हरिण, माकड, कुत्रे हे चित्रांत रंगविलेले दिसतात. उंट मात्र कोठेही आढळत नाहीत. जलचर प्राण्यांमध्ये मासे, कांसव व सुसरी दिसतात.

## ४.२ धार्मिक स्थिती :

वाकाटक काळात मराठवाड्यात हिंदू आणि बौध्द धर्म प्रचलित होते. हिंदू धर्मात शैव आणि वैष्णव संप्रदाय अर्थात पंथाचाही विकास झालेला होता.

## हिंदू धर्म :

वाकाटक काळात अभूतपूर्व धार्मिक जागृती झाली होती. वाकाटक राजवंशाचा मूळ पुरुष गृहपती वाकाटक हा बौध्द धर्माचा अनुयायी होता. त्याने आंध्रप्रदेशातील गुंटूर जिल्ह्यातील अमरावती येथे आपल्या दोन पत्नी व इष्टमित्रासह जाऊन तेथे दान दिले होते. याचा उल्लेख तेथील स्तूपाच्या स्तंभलेखात आढळतो.[४६] पुढे गृहपती वाकाटकांच्या वंशजाचे धार्मिक परिवर्तन झाले आणि ते वैदिक पौराणिक धर्माचे अनुयायी बनले. त्यांनी वैदिक अर्थात हिंदू धर्माला राजाश्रय दिला. यासाठी वल्लूरच्या ब्राह्मण घराण्यातील मुळ पुरुष यज्ञपति याचे योगदान महत्त्वाचे ठरले.

यज्ञपति याच्या उपदेशावरुन प्रथम विंध्यशक्तीने अनेक यज्ञ केले. यज्ञपतीचा मुलगा देव याचे राजदरबारात मोठे वजन होते. त्याच्या प्रभावामुळेच सर्व लोक व स्वत: राजे धार्मिक कृत्यात गढून गेले.[४७]

प्रथम प्रवरसेन हा धार्मिक वृत्तीचा राजा असून वैदिक धर्माचा मोठा पुरस्कर्ता होता. त्याने स्वत: अनेक श्रोत याग केले. त्याच्या वंशजांच्या बहुधा सर्व ताम्रपटांत त्याने केलेल्या चार अश्वमेधाचा व सप्तसोम संस्थेचा उल्लेख आढळतो. पुराणांत त्याच्या वाजपेय यज्ञांचा व त्यात त्याने दिलेल्या बहुमूल्य दक्षिणांचा मुद्दाम निर्देश केला आहे. या वाजपेय यज्ञांच्या अनुष्ठानानंतर त्याने सम्राट ही अत्यंत मनार्ह पदवी धारण केली. उत्तर किंवा दक्षिण भारतातील इतर कोणाही प्राचीन राजाने ही पदवी धारण केल्याचे इतिहासात नमूद नाही. पूर्वीच्या नृपतीप्रमाणे त्याने आपल्या धर्म विजयत्वाची निदर्शक अशी धर्ममहाराज ही उपाधिही धारण केली. तसेच विण्हुकड सातकर्णि राजाप्रमाणे तो

आपणास हारीतीपूत्र म्हणवून घेई. या उपाधीचा उल्लेख वाशीम  ताम्रपटांत आला आहे. प्रवरसेनाचा देव नामक अत्यंत धार्मिक, विद्वान व कर्तबगार प्रधानमंत्री होता. त्याचे वर्णन घटोत्कच लेण्यांतील लेखांत आले आहे. त्याच्या प्रभावामुळे राजासहित सर्व राष्ट्र धार्मिक त्यांच्या अनुष्ठांनात गुंतले होते, असे त्यात म्हटले आहे. प्रथम प्रवरसेनाच्या  कारकीर्दीतील  अनेक श्रोत यज्ञाचे अनुष्ठान या विद्वान व धर्मशील मंत्र्याच्या उपदेशानुसार झाले असावे.  द्वितीय  प्रवरसेन हा शिवाचा भक्त होता. भगवान शंकराच्या कृपेने आपल्याला आपल्या राज्यात कृतयुग स्थापन  करता आले असे त्याने आपल्या ताम्रपटात म्हटले आहे. त्याने भरपूर  दानधर्म केला. त्याचे आजपर्यंत १३ दानपत्र मिळाले आहेत. इतके दानपत्र आजपर्यंत कोणत्याही प्राचीन भारतीय राजवंशाच्या राजाची मिळाली नाहीत.

वाकाटक काळात पौराणिक हिंदू धर्माचा मोठा विकास झाला. वाकाटक राजे शिवाचे उपासक असल्याने या काळात अनेक शिवमंदिरे बांधली गेली. अनेक श्रोत याग करुन सुविख्यात झ-ालेल्या प्रथम प्रवरसेनाने वर्धा जिल्ह्यात भगवान शंकराचे देवालय बांधून त्याला प्रवरेश्वर असे नाव दिले होते. ते ज्या सव्वीस गावाच्या विभागात  होते. त्याला त्याच्या योगे प्रवरेश्वर षडिंवशितवाटक असे नाव पडले होते, असे बेलोरा ताम्रपटावरुन समजते.[४८]  प्रवरसेनाचा पुत्र प्रथम रुद्रसेन हा महाभैरवाचा भक्त होता. त्याने चांदा जिल्ह्यातील चिक्कम्बुरी ( सध्याचे चिक्कमारा ) येथे एक धर्मस्थान

( देऊळ ) बांधले असल्याचा उल्लेख देवटेक  येथील शिलालेखांत आढळतो.[४९] हे देऊळ अर्थातच महाभैरवाचे असावे. शंकराच्या प्रमाणे विष्णूची देवालयेही त्या काळी बांधली होती. वाकाटक नृपति द्वितीय रुद्रसेन हा बहुधा  आपली अग्रमहिषी  प्रभावती ही रामभक्त होती.[५०]  ती नंदिवर्धन राजधानी पासून केवळ तीन मैलांवर असलेल्या रामगिरीवर भगवान रामचंद्राच्या दर्शनास जात असे. त्या काळी रामगिरीवर श्रीरामप्रभूचे उत्तुंग देवालय बांधले असावे. त्यामध्ये  रामचंद्राच्या पादुकांची पूजा होत असे. कविकुलगुरु कालिदासानेही या रघुपतिपदाचा उल्लेख आपल्या मेघदूत काव्यात केला आहे. प्रभावतीगुप्ताचे आतापर्यंत सापडलेले दोन्ही ताम्रपट तिने कार्तिक शुक्ल एकादशीस उपवास करुन द्वादशीस पारण्याच्या वेळी रामगिरीवर दिले होते. एकांत रामगिरीस्वामीच्या ( म्हणजे भगवान

रामचंद्राच्या ) पादमूलांचा स्पष्ट उल्लेख आहे. दुसऱ्यांतील दानही भगवंताच्या पदमूलांना निवेदून एका भगवद् भक्त आचार्याला दिले होते. द्वितीय प्रवरसेनाच्याही एका ताम्रपटांत या पादमूलांचा उल्लेख आहे. त्यात दिलेल्या गावांचा अर्धा भाग चंद्र नामक वाण्याने विकत घेऊन दान दिला होता. विष्णूचे आणखी एक देवालय अश्वत्थखेटक ( बैतूल जिल्ह्यातील सध्याचे पट्टन ) येथे होते. त्यातही महापुरुषाच्या ( विष्णुच्या ) पादुकांचीच पूजा केली जात असे. त्या देवळाला जोडून असलेल्या अन्नसत्राकरीता द्वितीय प्रवरसेनाने काही भूमि दान दिली होती.

श्रीरामचंद्राचे आणखी एक उत्तुंग देवालय वर्ध्याजवळ पवनार येथे धाम नदीच्या तीरावर, जेथे सध्या श्री विनोबाजींचा जेथे आश्रम आहे त्या ठिकाणी, होते असे दिसते. त्याला रामायणातील विविध प्रसंगाच्या शिल्पाकृतीनी भूषित केले होते. त्यापेकी काही शिल्पे काही वर्षापूवी तेथे सापडली होती. **वैष्णव संप्रदाय :**

वाकाटक काळात वैष्णव संप्रदायाचाही विकास झाला. द्वितीय रुद्रसेन व द्वितीय प्रवरसेन हे दोन वाकाटक राजे विष्णूचे उपासक होते. बालाघाट ताम्रपटात द्वितीय प्रवरसेनाचे वर्णन परमभागवत असे केले आहे.[५१] विष्णूला परमेश्वर मानुन त्याची पूजा व उपासना करणाऱ्या पंथाला किंवा संप्रदायाला वैष्णव संप्रदाय म्हणतात. हा संप्रदाय व्यापक अर्थाने भागवत धर्म म्हणून ओळखला जातो.[५२] ॠग्वेदात विष्णू ही शुद्र देवता आहे. ते आदित्यरुप व अवकाश देवता आहे. ॠग्वेदात विष्णूच्या त्रिपाद विक्रमाचा गौरव केला आहे. विष्णू ही सृजनदेवता असल्याचे समजले जाते. वैदिक काळात विष्णूला फारसे महत्व नव्हते. परंतु नंतरच्या काळात त्याचे महत्व वाढत गेले. सृजन कल्पनेशी असलेल्या संबंधामुळेच विष्णूशी नारायणाचे ऐक्य कल्पिणे शक्य झाले. पाण्यापासून सृष्टीची निर्मिती झाल्याचे वर्णन वैदिक वाङ्मयात ऐक्य कल्पिणे शक्य झाले. पाण्यापासून सृष्टीची निर्मिती झाल्याचे वर्णन वेथ्दक वाङ्मयात आढळते. या अव्यक्त जलरुप आदितत्वासच नारायण म्हटले आहे आणि त्यातून हिरण्यगर्भ अंड निर्माण होऊन जग निर्माण झाले. नारायण हे देवमानवाचे विश्रांतीस्थान आहे. विष्णूने त्रिविक्रमाने देवमानवांना विश्रांतीसाठी स्थान प्राप्त करुन दिल्यामुळेच विष्णू हाच नारायण होय. शतपथ ब्राह्मण ग्रंथात विष्णूला पुरुष नारायण म्हटले आहे. नारायणाची उपासना अनेक उपनिषदांतही सांगितली आहे. तैतरिय अरण्यकात

नारायणाला भगवान हरी म्हटले  आहे. महाभारतात नारायणीधोपाख्यान आलेले आढळते. या नारायणीय पंथात अहिंसेला प्राधान्य आहे. यज्ञयागाने ईश्वरप्राप्ती होते अशी लोकांची श्रध्दा होती. पंचरात्रसंहिता हा या पंथाचा आगमग्रंथ आहे. यामध्ये स्मरण, कीर्तन, वंदन, पादसेवन, अर्चन व आत्मसमर्पण ही षडविध नारायण भक्ती सांगितली आहे.

विष्णू हा यज्ञरुप व सर्व देवात श्रेष्ठ असल्याची श्रध्दा लोकांत निर्माणझाली. ऐतरेय ब्राह्मण ग्रंथात या श्रध्देचे मूळ आहे. विष्णूने वेळोवेळी मत्स्यावतार, कुर्मावतार, वराहावतार, नरसिंहावतार, वामनावतार, परशुमावतार, रामावतार, कृष्णावतार, बुध्दावतार व कल्की अवतार हे दहा अवतार घेऊन पृथ्वीवर निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीत आपली विधायक भूमिका निभावली,  असा लोकविश्वास आहे.

हरिवंश, विष्णूपुराण व भागवत ग्रंथ हे वैष्णव संप्रदायाचे प्रमुख ग्रंथ आहेत. काळात वैष्णव संप्रदाय उदयास आल्याचे मानले जाते. याच काळात हिंदू, बौध्द व जैन तिन्ही धर्म प्रचलित होते. याच काळात ब्रह्मा, विष्णू व महेश ही त्रिदेव संकल्पना रुढ झाली. याच काळात वराह, वामन, नृसिंह व रामावतारातील विष्णूपूजा सुरु झाली. वैदिक यज्ञ मागे पडले व पौराणिक धर्माचे अनुकरण वाढले. उपासनेत भक्तीला प्राधान्य मिळाले. वाकाटक काळात अनेक ठिकाणी विष्णूची मंदिरे उभारण्यात आली. नांदेड जिल्ह्यात हदगाव तालुक्यात  शिऊर येथे वैष्णव पंथाच्या  लेणी आहेत. या लेण्यात स्तंभावर वैष्णवपंथाची विविध शिल्प कोरलेली आहेत.

## शैव संप्रदाय :

वाकाटक काळात वैष्णव संप्रदाय प्रमाणेच  शैव संप्रदायही प्रचलित होता. वाकाटक राजे शिवाचे उपासक होते. शिवाला परमेश्वर मानून त्याची उपासना करणाऱ्या पंथ किंवा संप्रदायाला शैव संप्रदाय म्हटले जाते. शिव हा भारतात सर्व जाती - जमातीतील लोकांकडून पूजेला जाणारा महादेव आहे. शैव संप्रदायांतर्गत पाशुपत, अघोरी, कापालिक, नाथ, काश्मिरी शैव, नयन्यार शैव, वीरशैव ( लिंगायत )  इत्यादी उपपंथ आहेत.[१३] या सर्व उपपंथानी शैव संप्रदायाचा संपूर्ण भारतात प्रसार केला.  बौध्द धर्माच्या विरुध्द निर्माण झालेल्या प्रतिक्रियामुळे जेव्हा वैदिक धर्माचे पुनरुत्थान झाले, तेव्हा या प्राचीन धर्माने जे अनेक परिवर्तित रुप प्राप्त केले, त्यापैकीच एक शैव संप्रदाय होय.

शिव हा वैदिक देवतापैकीच एक होता. शिवाचेच दुसरे रुप रुद्र आहे. वेदवाङ्मयात रुद्र या देवतेची स्तुती करणारी तीन सुक्ते आढळतात. वैदिक साहित्यात या देवतेसाठी शिव व रुद्र या दोन्ही नावाचा उपयोग केला आहे. रुद्र हे त्याच्या रौद्र अर्थात भीषण रुप प्रकट आणि शिव हे त्याचे कल्याणकारी रुप दर्शविते. जेव्हा ही देवता दुष्टाचे दमन किंवा सृष्टीचा प्रलय करते तेव्हा ती रुद्र रुप धारण करते आणि जेव्हा ही देवता सृष्टीचे पालन करते तेव्हा त्यास शिव आणि शंकर म्हटले जाते. डॉ. मॅकडोनल यांनी रुद्र व अग्नी यांच्यातील साम्यावरुन रुद्र हा विनाशाचे प्रतीक असल्याचे म्हटले आहे. डॉ. भांडारकर रा.गो. यांनीही रुद्र देवतेस सृष्टीतील विध्वंसक शक्तीचे प्रतीक म्हटले आहे. रुद्राला अथर्ववेदात पशुपती व महादेव ही विशेषणे प्रथम लावलेली आढळतात. त्यानंतरच्या काळात त्यास शिव, शिचतर, शंकर, गिरीकांत व गिरीश इत्यादी नावे देण्यात आली. वैदिक रुद्रालाच अग्नी या अर्थाने पृथ्वी, अंतरिक्ष व द्यौ या तीन ठिकाणी जन्मणारा म्हणून त्र्यंबक असे नाव रुढ झाले. भारतात शिवाची उपासना लिंग रुपाने प्रचलित आहे. सिंधू संस्कृतीत शिवाची उपासना लिंग रुपाने केली जात होती. सिंधू संस्कृतीच्या उत्खननात शंकूच्या आकाराचे व दंडगोलाकार लिंग मिळाले आहेत. हे लिंग दगड व चुन्यापासून तयार केले होते. शिवलिंग हे जननेंद्रियाचे प्रतीक समजले जाते. वैदिकांनी सिंधू संस्कृतीतील लिंगोपासना आत्मसात केली व तीच पुढे रुढ झाली. रामायण व महाकाव्यात शिवाला महादेव, महेश्वर, शंकर व त्र्यंबक व इत्यादी नावांनी उल्लेखिले आहे तर महाभारत या महाकाव्यात योग व तपश्चर्या या साधनांना शिवाच्या प्राप्तीचे मार्ग म्हणून महत्व देण्यात आले आहे.

पौराणिक वाङ्मयात शिव व पार्वती यांच्या ऐक्याचे तत्वज्ञान मांडले आहे. तसेच त्यामध्ये त्यांच्या उपासनेचा भक्तिमार्गही कथन करण्यात आला आहे. याच काळात भारतात अनेक शिवमंदिरांची स्थापना झाली आणि शिवलिंगाची पूजा सुरु
झाली. सामान्य शैव पंथ सौम्य आणि बुध्दिनिष्ठ असून विद्यज्ञ, क्रिया, योग आणि चर्या या चार पादांमधून शैव पंथाची शिकवण विशद केली आहे.[५४] विद्या या पदामध्ये पशू, पती व पाश यांची माहिती दिली आहे. पती म्हणजेच शिव हा कर्मपाशातून मुक्त आहे आणि तो पशूच्या म्हणजेच जीवाच्या कर्मानुसार उपभोग्य विश्वांची निर्मिती करतो- पती हा मंत्र, मंत्रेश्वर, महेश्वर आणि मुक्त

आहे, तर अमुक्त पशु, मल, कर्म, माया व रोधशक्ती अशा चार पाशांनी बध्द होतो. मलपाशामुळे ज्ञ ाान आणि कार्यशक्ती अवगुंठित होते, तर कर्मपाशामुळे पशूला कर्मफलाचा भोग प्राप्त होतो. पशू हा मायापाशामुळेच मायाजालात अडकतो. तसेच रोधशक्तीमुळे आत्मस्वरुप झाकले जाते. क्रिया, योग व चर्या हे मुक्तीचे मार्ग आहेत. मुक्तावस्थेत पशू शिवानुग्रह झाल्यामुळे शिवस्वरुप बनतो, परंतु मुक्तावस्थेतही पशू आणि पती यांचे एकात्म कल्पिले नाही. त्यामुळे हा पंथ द्वैतवादीच आहे. क्रियापादात संध्या, पूजा, जप व अग्निहोत्र हे वर्णाश्रम विहित मार्ग सांगितले गेले, तर योगपादात योग साधनेचा मार्ग सांगितला आहे. लिंगपूजा, नंदीपूजा, मंत्रजप आणि पंथोचित हा आचार चर्यापादात कथन केला आहे. या त्रिविध मार्गाने पाशमुक्त होऊन पशू शिवस्वरुप बनतो, अशी शैव धर्माची शिकवण होती. वाकाटक राजांनी अनेक ठिकाणी शिवमंदिरे बांधून शैव संप्रदायाचा विकास केला.

## बौध्द धर्म :

वाकाटक काळात हिंदू धर्माप्रमाणेच बौध्द धर्मही प्राचलित होता. परंतु हिंदू धर्माच्या तुलनेत या धर्माचा प्रभाव कमी होता. बौध्द धर्म हा प्राचीन धर्म असून गौतम बुध्द हे या धर्माचे संस्थापक आहेत.

गौतम बुध्दाच्या हयातीतच मराठवाड्यात पर्यायाने दक्षिण भारतात बौध्द धर्माचा प्रसार झालेला होता. जैन धर्माच्या तुलनेत महाराष्ट्रात बौध्द धर्माचाच सर्वप्रथम प्रसार व प्रभाव निर्माण झाला. बौध्द धर्म हा अवैदिक धर्मापैकी सर्वात लोकप्रिय धर्म होय. गौतम बुध्दाच्या आणि त्यांनी स्थापन केलेल्या संघाच्या शिकवणीमुळे समाजाला एक प्रकारची संघटन शक्ती प्राप्त झाली, त्यामधूनच एका नवीन संस्कृतीचा उदय झाला. गौतम बुध्दांनी वैदिक धर्मातील कर्मकांडावर चढविलेल्या प्रखर हल्ल्यामुळे आणि सांघिक जीवनाच्या प्रेमळ शिकवणीमुळे बौध्द धर्माच्या प्रसाराला गती मिळाली. याशिवाय त्यांनी जातीयतेवर प्रखर हल्ले चढवून जन्मावरुन जात ही कल्पना नाकारली. तसेच त्यांची मानवतावादी शिकवण समतेच्या तत्वावर आधारलेली होती.[५५] त्यामुळे बौध्द धर्माचा दक्षिण भारतात प्रसार झपाट्याने होऊ शकला. गौतम बुध्दांनी सर्वप्रथम कौंडिण्य, अश्वजित, महानाम, कश्यप आणि भद्रिक या पाच तपस्व्यांना सारनाथ येथे प्रथम

आपल्या नव्या धम्माची दीक्षा दिली.[५६] यानंतर त्यांनी वाराणसी नगरातील यश या मुलास वत्यांच्या ५४ मित्रांना धम्मदीक्षा देऊन त्यांना भिक्खू संघात सामील करुन घेतले.[५७] यश हा एक धनाढ्य व्यापाऱ्याचा मुलगा होता. गौतम बुध्दांनी यश व त्याचे ५४ मित्र जे भिक्खू झाले होते ते आणि ज्या पाच तपस्व्यांना प्रथम दीक्षा दिली होती ते पाच भिक्खू, अशा साठ भिक्खुंना एके दिवशी बोलाविले आणि त्यांना कल्याणप्रद अशा आपल्या सद्धम्माचा उपदेश करण्यासाठी चारही दिशांना संचार करण्याचा आदेश दिला.[५८] अशाप्रकारे धम्म प्रचारक, भिक्खू व व्यापाऱ्यामुळे गौतम बुध्दांच्या हयातीतच बौध्द धर्माचा प्रसार महाराष्ट्र व दक्षिण भारतात झाला होता. याचे श्रेय बावरी या वैदिक पंडिताला व त्यांच्या शिष्य समूहाला द्यावे लागते.[५९] बावरी हा वैदिक पंडित उत्तर भारतातील कोसल देशातील श्रावस्ती येथील रहिवाशी असून तो गौतम गुध्दाला समकालीन होता.[६०] इ.स.पू. ८०० ते इ.स.पू. ६०० मध्ये बावरी उत्तर भारतातून दक्षिण भारतात आला आणि तो अस्मक व मुलक या दोन राज्याच्या सरहद्दीजवळ गोदावरी नदीच्या तीरावर पैठण परिसरात आश्रम थाटून राहू लागला.[६१] त्याने तेथे एक महायज्ञ करण्याची तयारी सुरु केली. याचवेळी त्याला गौतम बुध्द व त्यांच्या मानवतावादी धर्म याची वार्ता समजली. याचा पडताळा पाहण्यासाठी, बुध्दाचे तत्वज्ञान कसून पाहण्यासाठी आणि शक्य झाल्यास बुध्दाला आव्हान देण्यासाठी त्याने आपल्या सोळा शिष्याना बुध्दांकडे राजागृह येथे धर्मवादासाठी पाठविले.[६२] गौतम बुध्दांशी झालेल्या चर्चेत या सोळा शिष्यांना पराभव स्वीकारावा लागला. बुध्दांच्या तत्वज्ञानाने प्रभावित झालेल्या या सोळा शिष्यांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला व ते परत पैठणला आपल्या गुरुकडे आले.[६३] त्यांनी आपला अनुभव आपले गुरु बावरीला सांगितला. शेवटी बावरी सुध्दा बुध्दांच्या व्यक्तिमत्व व विचाराने प्रभावित झाला.[६४] आणि त्यानेही बौध्द धर्माची दीक्षा घेतली. अशा रीतीने बावरी व त्यांचे सोळा शिष्य हे महाराष्ट्रातील पहिले बौध्द भिक्खू व धर्मप्रसारक ठरतात. त्यांनी व त्यांच्या शिष्यपरंपरेने दक्षिण भारतात बौध्द धर्माचा प्रसार केला.

ठाणे जिल्ह्यातील सोपारा ( सुप्परका ) येथील व्यापारी अर्हत पुण्ण याने श्रावस्ती येथे गौतम बुध्दांकडून धम्माची दीक्षा घेतली.[६५] यानंतर त्याने सोपारा येथे विहार बांधला व धम्माचा प्रचार सुरु केला. ईसिदिन्ना हा गोवा, महाड किंवा वाई येथील रहिवाशी असावा.[६६] तो सोनापरांत

देशातील व्यापारी होता. त्यानेही विहार बांधून बौध्द धर्माचा प्रचार सुरु केला. पंपसुयनी व सारथ्यप्पकरिणी या ग्रंथात पूर्णाच्या आमंत्रणावरुन गौतम बुध्द सोपाऱ्याला गेले होते, असा वृत्तांत आढळतो. सोपारा येथेच गौतम बुध्दांनी कृष्ण व गौतम या प्रबळ राजांना धम्मदीक्षा दिली होती. कृष्ण राजाच्या नावावरुन सोपाऱ्या शेजारच्या डोंगराला कान्हेरी असे नाव पडले. सोपाऱ्याच्या शेजारील मुसालिक नावाच्या टेकडीवर राहणाऱ्या ब्रह्मर्षीला गौतम बुध्दांनी धम्मदीक्षा दिली. सोपारा येथील भवनाच्या गृहस्थानेही बुध्दांकडून धम्माची दीक्षा घेतली होती, असा उल्लेख दिव्यावदान या ग्रंथात आढळतो.[६७] अशाप्रकारे साध्या आणि सोप्या शिकवणूकीमुळे आणि गौतम बुध्दांच्या प्रभावी व्यक्तिमत्वामुळे तसेच धम्मप्रचारक बौध्द भिक्खमुळे बौध्द धर्माचा प्रसार महाराष्ट्रात झाला.

वाकाटक काळात बौध्द धर्माला वाकाटक राजांनी आश्रय दिला. त्यामुळे याकाळात औरंगाबाद, वेरुळ, अजिंठा आणि घटोत्कच याठिकाणी बौध्द लेणी खोदण्यात आल्या. हरिषेण नृपतीचा सचिव वराहदेव याला ऐहिक वस्तूंचे क्षण भंगुरत्व पटल्यामुळे त्याने अजिंठा येथे आपल्या मातापित्यांना उद्देशून एक भव्य विहार लेणे कोरविले, व त गवाक्षे, दरवाजे, सुंदर चित्रावलि, अप्सरांच्या व इतर मूर्ति इत्यादिकांनी सुशोभित केले. त्याच्या मागील बाजूस बुध्दमूर्ति असून जवळच पाण्याचे टाके व नागराजाची मूर्ति असलेले लहानसे लेणे कोरले आहे. हे सुंदर लेणे त्याने बौध्द संघाला अर्पण केले.

वराहदेवाने अजिंठ्याच्या पश्चिमेस सुमारे दहा मैलांवर गुलवाडा येथे आणखी एक विहार कोरविले.[६८] त्याला आता घटोत्कच लेणे नाव आहे. याच्याही आंत मागील बाजूस धर्मचक्रप्रवर्तन मुद्रा असलेली भव्य बुध्दमूर्ति आहे. हे लेणे सुंदर शिल्पांनी व उत्तम नक्षीकाम केलेल्या स्तंभांनी सुशोभित केले आहे, पण यात चित्रे नाहीत. यातील लेखांत वराहदेवाने आपल्या पूर्वजांची माहिती दिली होती. पण तो लेख आता फारच खंडित झाला आहे. जवळच आणखी एक लहानसे विहार लेणे आहे. तेंही याच सचिवाने खोदून बौध्द संघास अर्पण केले आहे.

अजिंठ्यांची आणखी दोन लेणी वाकाटककालीन आहेत. ती म्हणजे क्रमांक १७ चे विहार लेणे व क्रमांक १९ चे चैत्य लेणे ही होत. ही दोन्ही लेणी हरिषेणाचा मांडलिक असलेलया ऋषीक देशाच्या एका अधिपतीने कोरविली. त्याने १७ क्रमांकाच्या लेण्यांत आपल्या पूर्वजांचा व

आपला वृत्तांत देणारा लेख कोरविला होता, पण दुर्दैवाने तो आता फार खंडित झाला आहे. अवशिष्ट भागावरुन असे दिसते की या राजाला आपला धाकटा भाऊ रविसांब याच्या अकाली निधनाने अत्यंत दु:ख झाले. संसाराची असारता पटल्यामुळे त्याने अत्यंत धार्मिकपणाने आपले आयुष्य घालविण्याचा निश्चय केला आणि अनेक स्तूप व विहार यांनी पृथ्वीला सुशोभित केले. त्याने अजिंठा येथे भगवान बुध्दाचे चैत्य आंत असलेला एकाश्म मंडप कोरविला. तेच सतरा क्रमांकाचे लेणे होय. जवळच त्याने गोड, हलके, स्वच्छ व थंडगार पाणी असलेले सुंदर टाके कोरविले. तसेच त्याच्या पश्चिमेस त्याने एक भव्य गन्धकुटीहि खोदविली. तिला आता क्रमांक एकोणीसचे चैत्य लेणे म्हणतात. ही लेणी त्यातील सुंदर शिल्पे व चित्रे यामुळे सुप्रसिध्द झाली आहे. वाकाटक राजांनी हिंदू मंदिरांना व ब्राह्मणांना भरपूर दान दिले. परंतु त्या तुलनेत मात्र बौध्द धर्मास कमी दान देण्यात आले. हेही काही कमी नव्हते.

## ४.३ आर्थिक स्थिती :

वाकाटक काळातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती होता. राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधनही शेती हेच होते. उत्पादनाचा दहावा भाग भूमीकर म्हणून शेतकरी राज्याला देत असत. राजाचे शेतकऱ्याकडे सर्वाधिक लक्ष असे. शेतकरी युध्द व राजकारणापासून दूर होते. शेतीतील पीक नष्ट होऊ नये यासाठी सैनिकांनी पिकातून जाऊ नये असा राजाचा आदेश असे. शेती हल व बैलाच्या मदतीने केली जाई. उत्पादन वाढण्यासाठी विभिन्न खतांचा वापर करीत. तसेच पाणीपुरवठा करण्यासाठी तलाव, कालवे व विहिरी खोदल्या जात. त्यासाठी राज्याकडून शेतकऱ्यांना आर्थिक अनुदान दिले जात असे. कालवे व पाटबंधाऱ्यातून राज्यामार्फत शेतीला पाणीपुरवठा केला जात असे. त्या मोबदल्यात काही कर शेतकऱ्यांकडून घेतला जात असे. शेतकरी हेच भूमीचे मालक असत. वराहमिहीरच्या बृहतसंहिता मध्ये रब्बी, खरीप व आणखी एका तिसऱ्या पिकांचा उल्लेख आला आहे. थोडक्यात, प्राचीन भारतातील लोकांच्या आर्थिक जीवनात शेती व्यवसायाला सर्वाधिक महत्व होते. लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून होती.[६९]

या काळातील लोक शेती करण्यासाठी विभिन्न अवजांराचा वापर करीत होते. बैल हा शेतीच्या कार्यात उपयोगी पडणारा महत्वाचा प्राणी होता. बैलाच्या मदतीने शेतीची संपूर्ण मशागत

केली जात असे. हल ( नांगर ) हे शेती उपयोगी महत्वाचे साधन होते. प्राचीन काळात हल ( लहान लाकडी नांगर ) व नांगल ( मोठा लोखंडी नागर ) असे नांगराचे दोन प्रकार होते. त्यामुळेच शेतकऱ्यांना हलिक असे म्हटले आहे. नांगराचा उपयोग शेतीकार्यात वैदिक काळापासून करण्यात आला आहे. नांगराने जमीन नांगरली जात असे. याच नांगराने दोन ते चार इंच खोल रेषा जमिनीत ओढली जाई. याच रेषेत बी बियाणे टोचली जात असत. नांगरास धारदार फाळ असे नांगर ओढण्यासाठी बैलांचा वापर केला जाई. या काळात सहा, आठ, बारा व चोवीस बैल नांगरास जुंपत असल्याचे उल्लेख संहिता व ब्राह्मण ग्रंथात आढळतात. शेतीचे लहान शेती व मोठी असे दोन प्रकार प्रचलित होते. मोठ्या शेतात पाचशे नांगराची आवश्यकता पडत असे. तसेच अनेक मजूर काम करीत असत. पिकांच्या उत्पादनात वाढ व्हावी यासाठी प्राण्यांच्या शेणाचा खत म्हणून वापर केला जाई. शेतकऱ्यांना उत्पन्नाचा दहावा हिस्सा शेतसारा ( भूमीकर ) राजांना द्यावा लागे.

लोक वर्षातून दोन वेळा आणि क्वचित प्रसंगी तीन वेळा पीक घेत असत. शेती ही मान्सुनवर अवलंबून असे.[७०] पाऊस कमी पडला तरी पिकांचे नुकसान होत असे व पाऊस अधिक झ ाला तरीही पिकांचे नुकसान होत असे. पाऊस वेळेवर पडल्यास पीक जोमदार येत असे ; परंतु पाऊस वेळेवर पडेलच असे नव्हते. त्यामुळे शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी प्राचीन काळात विविध योजना साकार झालेल्या होत्या. नद्यामधील पाणी अडवून धरणे व कालवे बांधले जात असत. अनेक विहिरी खोदल्या जात व अशा विहिरीतून पाणी बाहेर काढण्यासाठी रहाटाचा वापर केला जाई. हे पाणी शेतीला पुरविले जाई. वैदिक काळात विहिरीवर झाकण बसविले जात असे. सम्राट अशोक व चंद्रगुप्त मौर्याच्या काळात नद्यांचे पाणी अडवून अनेक ठिकाणी धरणे बांधली होती. विहिर, तलाव व धरणे बांधण्यासाठी राज्याकडून पैसा खर्च केला जाई. तसेच शेतकऱ्यांना अनुदानही दिले जाई. पाणीपुरवठ्याचा मोबदला म्हणून शेतकऱ्यांना राज्याच्या तिजोरीत काही कर भरावा लागे.

या काळात विविध प्रकारची पिके घेतली असत असत. वर्षातून कमीत कमी दोन व क्वचित प्रसंगी तीनही पिके घेतली जात असत. शेती संपूर्णपणे मान्सुनवर अवलंबून असली तरी शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी नद्यांवर धरणे व कालवे बांधण्यात आले. तसेच विहिरीही

खोदण्यात येत असत, शेतीत रब्बी आणि खरीप पिके घेतली जात असत. तांदुळ , चरु, जव, ज्वारी, कापूस, हरभरा, एरंडी, भुईमुग, तीळ मसुर, मूग, मिरची, अद्रक, हळद, अलसी व सरस या पिकांचे उतपादन घेतले जाई. तसेच अनेक प्रकारच्या वृक्षांचीही लागवड केली जात असे. औषधीयुक्त वृक्ष मोठ्या प्रमाणात लावत असत. विविध फळांची झाडेही लावली जात असत. अंगूर, शाक व ईख्र ही महत्त्वाची फळझाडे होती.

राजा हा जमिनीचा प्रमुख नाही तर प्रजेचा प्रमुख मानला जात असे. त्यामुळे जमिनीवरील खाजगी मालकी मान्य केल्याचे दिसते. राजाला नियमितपणे कर देण्याचाही अधिकार ऋग्वेदकाळात नव्हता. राजाने युध्दात विजय मिळविल्यास लोक खुशीने व स्वइच्छेने आपल्या ऐपतीनुसार त्यास वस्तू किंवा धान्य देत असत. ऋग्वेद काळात जमिनीची मोजणी केली जात होती. यावरुन जमिनीच्या खाजगी मालकीची माहिती मिळते. अत्री ऋषीची कन्या अपाला ही आपल्या पित्याच्या जमिनीची उत्पादनक्षमता वाढावी व पीक भरपूर यावे यासाठी इंद्राची प्रार्थना करीत होती. यावरुनही स्पष्ट होते की, या काळात जमिनीची खाजगी मालकी मान्य करण्यात आली होती. ब्राह्मण ग्रंथ, बौध्द व जैन साहित्य आणि नारदस्मृती व बृहस्पती स्मृतीवरुनही जमिनीवरील खाजगी मालमत्तेची माहिती मिळते. असे असले तरी राजा हाच सर्व जमिनीचा मालक आहे अपाणि प्रजेकडे लागवडीसाठी असलेल्या जमिनीच्या बदल्यात कर घेण्याचा अधिकारही त्याला असल्याचे मान्य करण्यात आले होते. जोपर्यंत जमीनधारक राजाला कर देईल तोपर्यंत त्यास जमिनीचा उपभोग घेता येत असे. मौर्य, गुप्त, वाकाटक[७१] आणि वर्धन काळातही खाजगी मालकी मान्य केलेली होती आणि जमीनधारक हा राजाला वार्षिक कर देत असे.

जमिनीवरील कर हे राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख आणि महत्त्वाचे साधन होते. हा कर घेत असताना उत्पादकांची उत्पादनक्षमता नष्ट होणार नाही याचीही काळजी घेतली जात होती. आकस्मिक संकटाच्यावेळी मात्र कराचे प्रमाण कमी केले जात असे जमिनीची उत्पादनक्षमता, पाणीपुरवठ्याची सोय व पिकांचा विचार करुन करांचे प्रमाण ठरविले जात होते. ग्रामणी, अनुभवी व वृध्द लोकांच्या संमतीनेच करांचे प्रमाण ठरविले जात असे. नव्याने जमीन लागवडीखाली

आणणाऱ्यास सुरुवातीस काही वर्षे करीत सूट दिली जात असे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने उत्पादनावर कर घेतला जाई.

शेतीप्रमाणेच प्राचीन भारतातील लोकांचा पशुपालन हा दुय्यम परंतु महत्त्वाचा व्यवसाय होता.[७२] दूध, दही, लोणी, तूप आणि दुधापासून बनविलेले अनेक पदार्थ हे लोकांचे प्रमुख अन्न होते. त्यामुळे दूध देणारे प्राणी पाळण्यावर लोकांचा सर्वाधिक भर होता. गाय, बैल, घोडा, गाढव, बकरी, मेंढी, कुत्रा, हत्ती, डुक्कर, व खेचर हे प्राणी पाळले जात होते. गाईचे समाजात महत्वाचे स्थान होते. त्यामुळे लोक सर्वाधिक गाई पाळत असत. गाय हीच मूल्यवान संपत्ती होती. यज्ञप्रसंगी मूळ दक्षिणा म्हणून गाय दिली जाई. तसेच गाय ही वस्तुविनिमयाचे महत्वाचे साधन होते. गाय पवित्र वस्तू ठरल्यामुळे गाईचा वध करणाऱ्यास मृत्यूदंड दिला जाई. एखाद्याकडे अधिक गाई असणे म्हणजे ते त्याच्या प्रतिष्ठेचे लक्षण समजले जाई. गाय भेट म्हणूनही दिली जात असे. राजा जनकाने आपल्या सभेतील विद्वानांचा सन्मान एक हजार गाई भेट देऊन केला होता. पशूंना अन्नपाणी देण्यासाठी व त्यांना रानात चारण्यासाठी घेऊन जाण्यासाठी एक गोपालकांची नियुक्ती केली जाई. हत्ती, घोडा या प्राण्यांचा उपयोग युध्दात होत असे. कुत्रा घराचे संरक्षण करीत असे. घोडा रथ ओढण्याचेही काम करीत असे. उंट व हत्ती सामान वाहतुकीचे महत्वाचे साधन होय. या पाळीव प्राण्यांच्या शेणाचा उपयोग शेतीत खत म्हणून टाकण्यासाठी होत असे.

या काळात उद्योगधंद्याचा विकास झालेला होता. प्राचीन भारतात अनेक व्यवसाय व उद्योगधंदे करीत असत. क्षत्रिय युध्द करण्यात मग्न होते, वैश्य व शूद्र हे लोक शेती व्यवसाय व पशुपालन आणि उच्चवर्णीयांची सेवा करत असत. कोणत्याही वर्णातील व्यक्ती कोणताही व्यवसाय करीत असे. समाजात शिल्पकांराचा उदय झालेला होता. ऋग्वेदात विभिन्न शिल्पकांराच्या नावाचा व त्यांच्या कार्याचा उल्लेख आढळतो. सुतार हा विविध प्रकारचा रथ, गाड्या व नौका बनवीत असे.[७३] त्यावर सुंदर नक्षीकाम केले जाई. ऋग्वेदात लोहारासाठी कर्मार या शब्दाचा प्रयोग करण्यात आला आहे. लोहार, तांबे, लोखंड, लाकूड व मातीपासून विभिन्न प्रकारची भांडी व शस्त्रे बनवीत असे. चर्मकार कातड्यापासून अनेक वस्तू तयार करीत असे- कातड्याची भांडीसुध्दा बनवीत असत. गवतापासून चटई बनवीत असत.

उद्योगधंदे व व्यवसायाचा फार विकास झाला. श्रमविभाजनाचे तत्व याच काळात उदयास आले. संहिता व तैत्तरीय ब्राह्मण या ग्रंथात विविध व्यवसाय व उद्योगधंद्याची सूची आढळते. मत्स्य उद्योग, धोबी, रंगरेज ( रंगारी ), नाई ( न्हावी ) जौहरी, रथकार, कुंभार, लोहार, नट, महावत, गायक, नर्तक, ज्योतिषी, वैद्य, धातूकार, सावकार, घरकाम करणारे सेवक, टोपली विणणारे व दोरी बनविणारे इत्यादी लोक आपल्या व्यवसायात पारंगत होते.

या काळात अनेक लहानमोठे उद्योगधंदे प्रचलित होते. कुटीर उद्योग प्रत्येक गावात चालत होते. मातीची भांडी तयार करण्याचे काम कुंभार करीत असे. लोखंडी भांडी, अस्त्र - शस्त्र व शेतीसाठी लागणारी अवजारे लोहार तयार करत असे. लाकडाची अवजारे तयार करण्याचे काम सुतार करत असे तर आभूषणे बनविण्याचे काम सोनाराचे असे. कपडे विणण्याचाही उद्योग त्या काळात प्रचलित होता. यावरुन असे दिसते की, वाकाटक काळात लोक आपापला परंपरागत व्यवसाय करत होते. सुती वस्त्रोद्योग त्या काळात प्रगतीवर होता. रेशमी, सुती व लोकरी वस्त्रे तयार केली जात होती. मूर्तीकाम आणि मोतीकाम त्या काळात प्रसिध्द होते. धातू उद्योग प्रसिध्द होता.

व्यवसायाच्या विकासाबरोबरच व्यापाराचाही मोठ्या प्रमाणात विकास झाला. अंतर्गत व्यापाराबरोबरच विदेशी व्यापारातही वाढ झालेली होती. व्यापाऱ्यांना राजाकडून संरक्षण प्राप्त झाल्यामुळे व्यापारी लोक वस्तूच्या खरेदी - विक्रीसाठी भारतात सर्वत्र भ्रमण करीत असत. व्यापार भूमार्ग व जलमार्गाने होत असे. नदी व समुद्रातून व्यापारी आपला माल जहाजातून वाहून नेत असत. अश्विनी युगलच्या स्तुतीमध्ये ऋषी स्पष्ट म्हणतो की, या देवतांनी समुद्रात विपत्तिग्रस्त भुज्यू नावाच्या व्यक्तीस शंभर पतवारोवाली नावेमार्फत वाचविले होते. याचा अर्थ वैदिक काळापासून समुद्र मार्गाने व्यापार चालत होता. वैश्य वर्णाचे लोक व्यापार करण्यात आघाडीवर होते. देशात दोन प्रकारचे व्यापारी होते. पहिल्या प्रकारातील व्यापारी लोकांना श्रेष्ठी म्हटले जाई.[७४] ते नगर किंवा गावात आपले दुकान घालून व्यापार करीत असत. दुसऱ्या प्रकारातील व्यापाऱ्यांना सार्थवाह म्हणत. हे लोक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊन आपला माल विकत असत. कपडे, मीठ, खाद्यपदार्थ, मसाले व बहुमूल्य धातूच्या वस्तू व मूर्ती या वस्तूंचा आंतरिक व्यापारात समावेश होत असे. मलमल, रेशमी वस्त्र, पैठणी, मसाले, नारळ, सौंदर्यप्रसाधने, रत्ने व सुगंधित

द्रव्ये भारतातून विदेशी पाठवीत असत. बैलगाडी, हत्ती, घोडा व गाढव ही वाहतुकीची साधने होती. गावात किंवा नगरात दुकाने घालून व्यापार करणाऱ्यांना श्रेष्ठी म्हणत असत. तर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल नेऊन विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांना सार्थवाह म्हणत असत.[७५] व्यापार करण्यासाठी सार्थ बनवून यात्रा करीत असत. त्याच्या प्रमुखास सार्थवाह म्हणत असत. सार्थवाह संपूर्ण सार्थाच्या विभिन्न ठिकाणी व्यापाऱ्यांच्या निवासाची, भोजनाची, त्यांच्या सुरक्षिततेचे व भूमार्गदर्शकाचे कार्य करीत असे. सार्थ व्यापाऱ्यांच्या प्रवासात त्यांचे व त्यांच्या मालाचे चोर, दरोडेखोर लुटारु व जंगली प्राण्यापासून रक्षण करण्याचे काम थलनियामक नावाची व्यक्ती करीत असे.

बौध्द साहित्यात सार्थवाहचा उल्लेख अनेक ठिकाणी आढळतो. महात्मा गौतम बुध्दास सार्थवाह म्हटल्याचे उल्लेख बौध्द साहित्यात आढळतात. तसेच त्यांनी व्यापाऱ्यांना योग्य मार्गदर्शन करुन संभाव्य हानीपासून वाचविल्याच्याही कथा जातक कथात आढळतात. व्यापारी केंद्रांकडे किंवा निर्यातीच्या ठिकाणी व्यापाऱ्यांना सुखरुप थांबे, बाजारभाव, घनदाट अरण्ये, चोर, लुटारु व दरोडेखोरांची ठिकाणे, बाजारपेठांची लक्षणे व मागणी पुरवठ्याचे तंत्र याबद्दलचे ज्ञान सार्थवाहाला असणे आवश्यक होते. सार्थवाह ज्यापथाने मार्गक्रमण करीत असत त्यास सार्थवाहपथ म्हणत असत.

वरील प्रकरणामध्ये वाकाटक कालीन सामाजिक , धार्मिक व आर्थिक स्थितीचा आढावा घेतला आहे. वाकाटक कालीन समाजामध्ये वर्ण व्यवस्था प्रचलित असून समाजामध्ये ब्राह्मण वर्गाला सर्वच स्थान होते. लोक शाकाहारी व मांसाहारी होते. स्त्री - पुरुष विविध प्रकारची केस रचना व पोषाख करीत असून या काळात हिंदू धर्माचा प्रभाव होता. हिंदू धर्मात शैव व वैष्णव संप्रदाय लोकप्रिय होते. हिंदू धर्माबरोबरच बौध्द धर्म हि प्रचलित होता. वाकाटक कालखंडात शेती, पशुपालन, विविध व्यवसाय, उदयोगधंदे व व्यापार यांची भरभराट झालेली असून वाकाटककालीन मराठवाडा आर्थिक दृष्टया समृध्द होता.

# संदर्भ सूची


१. ऋग्वेद १०/९०/१-२,१२.

२. कित्ता.

३. महाभारत, शांतीपर्व, १२/१२२/४-५

विष्णु पुराण, १/६/६

वायुपुराण, ९/११३

मनुस्मृती, अ. १ श्लो.८७-९१.

४. भगवद्गीता, ४/१३

चातुवर्ण्य मया सृष्ट गुणकर्मविभागश: ।

५. महाभारत, शांतीपर्व, १२/१८८/५.

६. मनुस्मृती, अ.१ श्लो.८७-९१.

७. गोयल प्रीतीप्रभा, भारतीय संस्कृती, १९९२, पृ.१९.

८. मनुस्मृती, अ.१ श्लो. ८७-९१.

९. कित्ता.

१०. आपस्तंब धर्मसूत्र, १.६.१८.२१-२३.

काणे पी.व्ही., धर्मशास्त्राचा इतिहास, पृ.१२६,१२७.

११. कित्ता, १.१०.२९.६.

परीक्षार्योपि ब्राह्मण आयुधं नाददीत ।

१२. मनुस्मृती, अ.८ श्लो. ३४८.

शस्त्र द्विजातिभिर्ग्राह्य धर्मो यत्रोपरुध्यते ।

द्विजातीनां च वर्णांना विप्लवे कालकारिते ।

१३. गोयल प्रितीप्रभा, पूर्वोक्त, पृ.३४.

१४. आपस्तंब धर्मसुत्र, २.९.२५.१०.

गुरुनमात्यांश्च नातिजीवेत् ।

१५. आपस्तंब धर्मसुत्र, २.९.२५.११.

न चास्य विषये क्षुधा रोगेण हिमातपाभ्यां वावसीदेदभावाध्दुध्दिपूर्व वा कश्चित् ।

१६. कित्ता, २.९.२५.१५.

क्षेमकृदाजा यस्य विषये ग्रामेरण्ये वा तस्करभयं न विद्यते.

१७. किता, २.५.११.२.

न च सन्देहे दण्डं कुर्यात् ।

१८. किता, २.५.११.२३.

१९. गोयल प्रीतीप्रथा, पूर्वोक्त, पृ.३५.

२०. मनुस्मृती, अ. ९ श्लो. ३२५-३३४.

२१. मनुस्मृती, अ.९ श्लो. ३२५-३३४.

२२. गोयल प्रितीप्रथा, पूर्वोक्त, पृ.३६,३७.

२३. Buhalar, Archaeological Survey of western India - Vol - IV, 1883, p. 124, plate No. 67.

२४. पाटील गौतम, मराठवाड्याचा सांस्कृतिक इतिहास, २०११, पृ.१८, १९.

२५. किता, पृ.१६,१७.

२६. मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काल,१९५६, पृ.८.

२७. किता, पृ.८१.

२८. Altekar A.S., The Position of women in Hindu civilization, 1962, p. 35.

२९. Ibid. P -58

३०. मिराशी वा.वि., पूर्वोक्त, पृ. ९७.

३१. किता, पृ.९८.

३२. किता, पृ.९९.

३३. Altekar A.S., Education in Ancient India, 1938, p. 103.

३४. bid. P -105

३५. bid. P -107

३६. कठारे अनिल, प्राचीन भारत, २००१, पृ.१२७.

३७. मिराशी वा.वि., पूर्वोक्त, पृ.८९.

३८. किता, पृ.९०

३९. किता, पृ.९२.

४०. किता, पृ.९३.

४१. किता, पृ.९४.

४२. किता, पृ.

४३. कित्ता, पृ.९५.

४४. कित्ता, पृ.९६.

४५. कित्ता, पृ.८६.

४६. Epigraphia Indica - Vol-XV, p. 258.

४७. Buhalar, Archaeological Survey of western India-Vol-IX, p. 138.

४८. Epigraphia Indica-Vol-XXIV, p. 260-67.

४९. Caningham, Archaeological survey report - Vol-VII, p. 123-25.

५०. मिराशी वा.वि., पूर्वोक्त, पृ.१०४.

५१. Eipgraphia India - Vol-IX, p. 367.

५२. साखरे विजया, प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती, २००९, पृ.३०३.

५३. कित्ता, पृ.३०५.

५४. कित्ता, पृ. ३१०.

५५. Bapat P.V. (Ed.), 2500 Years of Buddhism, 1971, p. 38.

५६. आंबेडकर भी.रा., पूर्वोक्त, पृ.९५.

५७. कित्ता, पृ.१०६.

५८. मोरे एम.एस., महाराष्ट्रातील बौध्द धम्माचा इतिहास, २०००, पृ.३३.

५९. बापट पु.वि. ( संपा.),सुत्तनिपात, १९५५.

६०. कित्ता, ५.१.१ गा. क्र. ९७६.

६१. कित्ता, ५.१.२ गा.क्र.९७७.

६२. कित्ता, ५.१.३८ गा.क्र.१०१३.

६३. कित्ता, ५.१८.५ गा.क्र.११२८.

६४. कित्ता, ५.१८.२५ गा.क्र.११४८.

६५. मोरे एम.एस., पूर्वोक्त, पृ.५,३६.

६६. कित्ता.

६७. कित्ता.

६८. Buhalar, Archaeological sarvey of western India-Vol-IV, p. 138.

६९.	साखरे विजया, पूर्वोक्त, पृ.३१४.

७०.	कित्ता, पृ.३१५.

७१.	कित्ता, पृ.३१७.

७२.	कठारे अनिल व  नगराळे एन.एन., मराठवाड्याचा इतिहास, १९९९, पृ.१३८.

७३.	कित्ता., पृ.१४०.

७४.	 पाटील गौतम, मराठवाड्याचा सांस्कृतिक इतिहास,  २०११, पृ.७९.

७५.	कठारे अनिल व  नगराळे एन.एन., पूर्वोक्त, पृ.१३९.